मासिक वार्तापत्र • अंक 15 • नोव्हेंबर 2020 • सहयोग मूल्य - रु. 5 • 12 पाने



कामगार बिगुल
नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

मोदी सरकारचे नवीन शिक्षण धोरण 5
बाबरी मशिद विध्वंसावर कोर्टाचा निर्णय 7
देशाचे 'हिरोज्' अडकलेत कोरोनाच्या मृत्यूसापळ्यात! 12

# शेती संबंधी तीन कायद्यांचे वास्तव जाणून घ्या!

## कामगार, गरिब शेतकऱ्यांनो: धनिक शेतकरी, कुलकांच्या मागण्यांमागे धावू नका ! काळाबाजारा विरोधात लढा उभा करा!

संपादक मंडळ

मोदी सरकारने शेती संबंधात तीन अध्यादेश जून मध्येच काढले होते आणि सप्टेंबर महिन्यात त्यांना संसदेत पासही करवले. या कायद्यांच्या विरोधात देशभर एक आंदोलन उभे राहिले आहे. या आंदोलनामध्ये धनिक शेतमालकांसोबतच, लहान शेतकऱ्यांचा एक हिस्साही आंदोलनात सामील झाला आहे. स्वत:ला कामगारवर्गाचे प्रतिनिधी म्हणवणारे काही नकली डावे पक्ष कामगारवर्गालाही या आंदोलनात ओढत आहेत. शेतकरी संघटनेसारख्या बाजार व्यवस्थेच्या समर्थक काही संघटना या कायद्यांचे स्वागत करत आहेत. शेतमालाला हमी भावाची मागणी हा चालू असलेल्या आंदोलनाचा केंद्रबिंदू आहे. कामगार वर्गीय आंदोलनाचे नुकसान टाळण्यासाठी कृषी कायद्यांविरोधातील आंदोलनाचे वर्गचरित्र समजणे, त्याच्या मुख्य मागण्या आणि त्या मागण्यांचे कामगार विरोधी चरित्र समजणे व आपली स्वतंत्र कामगार वर्गीय भुमिका उभी करणे आवश्यक आहे.

**शेती संबंधातील हे तीन कायदे काय आहेत?**

**पहिला कायदा 'शेती उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (संवर्धन आणि सरळीकरण)'** (Farmers' Produce Trade and Commerce (Promotion and Facilitation) Bill, 2020) आहे. पूर्वी शेतकऱ्यांना आपला माल कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये विकण्याचे, आणि तेथे किमान हमी भावाला माल विकत घेण्याचे बंधन होते. या कायद्यानुसार आता कोणीही खाजगी खरेदीदार शेतकऱ्याचा माल विकत घेऊ शकतो. थोडक्यात आता शेतमालाची विक्री खुल्या बाजारात केली जाईल आणि किमतींवरचे सरकारी नियंत्रण संपुष्टात येईल.

**दुसरा कायदा आहे 'हमीभावा वर शेतकऱ्यांसोबत (सशक्तीकरण आणि संरक्षण) करार आणि शेती सुविधा कायदा'** (Farmers (Empowerment and Protection) Agreement on Price Assurance and Farm Services Bill, 2020). या कायद्यानुसार शेतकरी आता कोणत्याही कंपनीसोबत, मध्यस्थासोबत कोणत्याही उत्पादनाच्या विक्रीसाठी करार करू शकतो. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये असलेली आडते आणि व्यापाऱ्यांकडे जाण्याची त्यांना आता सक्ती राहिलेली नाही. यानुसार मोठमोठ्या कंपन्यांना आता शेतकऱ्यांसोबत **उत्पादन सुरु होण्याअगोदरच उत्पादनाचे प्रमाण, गुणवत्ता, प्रकार यांच्या आधारावर करार करता येतील. करार पाच वर्ष काळापर्यंतचे करता येतील.**

**तिसरा कायदा आहे 'आवश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा'** (Essential Commodities (Amendment) Bill 2020). या कायद्याच्या जुन्या आवृत्तीनुसार सरकारवर अन्नधान्याचा एक पुरेसा साठा करून ठेवणे बंधनकारक होते. परंतु झालेल्या दुरुस्तीमुळे हे बंधन हटवले गेले आहे आणि फक्त नैसर्गिक संकट वा युद्धासारख्या स्थितीमध्ये हे बंधन राहिल.

या तिनही कायद्यांचा स्वतंत्र पणे आणि एकत्रितपणे कामगार वर्गावर, छोट्या शेतकरी वर्गावर, धनिक शेतकरीवर्गावर काय खरा परिणाम होणार आहे हे समजणे आणि कायदे बनवणाऱ्या भाजपसहीत कायद्यांना नकली विरोध करणाऱ्या काँग्रेस-राष्ट्रवादी-शिवसेनेपासून ते विविध राज्यांमधील इतर पक्षांचे ढोंग समजणे गरजेचे आहे.

या कायद्यांमुळे महागाई वाढणे, काळाबाजारी वाढणे असे **कामगार वर्गावर, गरिब शेतकरी वर्गावर हल्ला करणारे परिणाम** होणार आहेत, परंतु सध्या देशामध्ये पंजाबातील अकाली-दलापासून ते महाराष्ट्रातील शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी सारख्या सत्ताधारी पक्षांपर्यंत सर्वांनी छेडलेल्या, आणि

पान 6 वर

# राशन का मिळत नाही?

## कशाप्रकारे अन्नसंपन्न भारतात भांडवलशाही जनतेला उपाशी ठेवत आहे याचे एक विश्लेषण

✍ निखिल एकडे

*एक माणूस भाकरी थापतो*
*एक माणूस भाकरी खातो*
*एक तिसरा माणूस सुद्धा आहे*
*जो ना भाकरी थापतो ना भाकरी खातो*
*तो फक्त भाकरीशी खेळतो*
*मी विचारतो--*
*'तो तिसरा माणूस कोण आहे?'*
*माझ्या देशाची संसद मौन आहे.*
*- कवी धुमील, 1971 ('संसद से सडक तक')*

गंभीर अंतर्गत आजाराचं भयावह रूप सोनोग्राफी मुळे समोर यावं तसाच काहीसा भांडवली व्यवस्थेचा 'स्कॅन' कोरोना महामारी ने केला आहे. 'स्कॅन' मुळे दैनंदिन त्रासाचा पोटातला आजार अतिशय स्पष्टतेने दिसावा तसे लॉकडाऊन ने कामगार-कष्टकरी वर्गाच्या व एकंदर भांडवली समाजाच्या जर्जर आजाराचे मानवद्रोही स्वरूप उघड केले आहे. नोटबंदी प्रमाणेच अत्यंत अनियोजित, तडकाफडकी आणि देशातील कोट्यवधी प्रवासी कामगार, असंघटित-संघटित क्षेत्रातील कामगार, बिगारी काम करणारे, पथारीवाले, वयोवृद्ध, निराधार, झोपडपट्टीवासी, बेघर इत्यादी कोणाचाही विचार न करता, 23 मार्च 2020 ला नरेंद्र मोदींनी लॉकडाऊन ची घोषणा केली. अनियोजित लॉकडाऊन मुळे देशातील कोट्यवधी कष्टकरी-कामगारांना अतोनात हालअपेष्टाना सामोरे जावे लागले. त्यातील सर्वात गंभीर समस्या म्हणजे उपासमार. पायी हजारो किमी दूर आलेल्या प्रवासी कामगारांची स्थिती तर अतिशय भयावह व दयनीय होती.

स्ट्रँडेड वर्कर्स अक्शन नेटवर्कने (SWAN) 27 मार्चला एक अहवाल जाहीर केला. या अहवालात मोठ्या प्रमाणावर शहरांमध्ये अडकून पडलेल्या स्थलांतरीतांकडे स्वत:चे रेशन कार्ड नसल्याने ते भूकबळी ठरू शकतात अशी भीती व्यक्त केली होती. नमुन्यातील 11 हजार मजुरांपैकी 50 टक्के मजुरांकडे केवळ एका दिवसाचे रेशन होते, तर 72 टक्के मजुरांकडे फक्त 2 दिवस कसेतरी पुरेल एवढेच राशन होते आणि 89 टक्के मजुरांना लॉकडाऊनच्या काळात त्यांच्या मालकांनी एकही रुपया दिला नसल्याचे अहवालात नमूद केले गेले होते. सरकारी दावे काहीही असले तरी 97% प्रवासी कामगारांना सरकारकडून 1 रुपयाची सुद्धा नगद मदत मिळाली नाही. कमीअधिक हीच स्थिती इतर कामगारांची सुद्धा होती. ह्यावरूनच आपल्याला अंदाज येऊ शकतो की अन्न, पाणी, निवाऱ्याची व सामाजिक सुरक्षेची कुठलीही तयारी न करता जाहीर केलेल्या लॉकडाऊन मुळे ह्या देशातील 80-90 कोटी कष्टकरी-कामगार जनतेची काय स्थिती झाली असेल व देशातील सत्ताधारी वर्ग किती बेपर्वा असु शकतो आणि सत्तेच्या मस्तीत काहीही करू शकतो.

नोव्हल कोरोना व्हायरसची जगाला माहिति होऊन जवळपास 4 महिने झालेले होते आणि त्याच्या गांभीर्याबद्दल जागतिक आरोग्य संघटनेकडून जगाला धोक्याचा इशारा मिळून जवळपास 3 महिने लोटले होते. तरीही देशातील सरकारांनी मार्च महिन्यापर्यंत काहीही तयारी केलेली नव्हती. तडकाफडकी लॉकडाऊन लागू करूनही सरकारला देशातील जनतेची अन्नाची गरज भागवणे सहज शक्य झाले असते. ते कसे? ते समजण्यासाठी हे बघूयात की आपल्या देशाची अन्नाची गरज आहे तरी किती आणि देशात अन्नाचे उत्पादन होते किती.

सरकारी दाव्यानुसार 80 कोटी लोकांना धान्य दिल्या जाते त्यामुळे अन्नधान्याच्या गरजेचा अंदाज लावण्यासाठी सरकारी आकड्यांचाच वापर करूयात. 2018-19 मध्ये वर्षभरात सार्वजनिक वितरण प्रणालीतून झालेला तांदूळ खप 30.6 दशलक्ष टन, इतर कल्याणकारी

पान 9 वर

# घरकामगार महिलांसाठी कोरोना ठरला दुष्काळात तेरावा महिना

✍ नेहा

घराची व्यवस्था नीट व सुरळीत ठेवण्यासाठी जी काही घरातली कामे करावी लागतात ती कामे करण्यासाठी बाहेरील व्यक्ती मोलमजुरी देऊन कामावर ठेवली जाते, त्याला आपण घरकामगार म्हणतो. घरकाम हे अतिशय मेहनतीचे व श्रमाचे काम आहे, परंतु इतर मेहनतीच्या कामांप्रमाणेच या कामालाही हलक्या दर्जाचेच काम म्हणून पाहिले जाते आणि सरकारी पातळीवर तर अनेक ठिकाणी त्याला कामाचा दर्जाही दिला जात नाही. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेनुसार घरकाम करणाऱ्या महिलांचे म्हणजेच दुसऱ्याच्या घरी काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण एक कोटीपेक्षा जास्त आहे.

घरकाम करणाऱ्या महिला प्रामुख्याने असंघटित क्षेत्रामध्ये येतात त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचे कायदेशीर संरक्षण प्राप्त नाही. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अन्याय अत्याचार आणि छळाच्या विरोधात त्यांना कोणताही कायदेशीर दावा करता येत नाही. उलट मोठ्या प्रमाणामध्ये घरकाम करणाऱ्या महिलांना कामचुकार, आळशी, बेईमान, बेजबाबदार अशाप्रकारे हिणवले जाते आणि अनेकदा तर चोरीचे आळही घेतले जातात.घरकाम करणाऱ्या महिलांना मिळणारी मजुरी अत्यंत कमी प्रमाणात मिळते किंवा नगण्य मिळते. कधी कधी तर मजुरी कमी मिळत असल्यामुळे नाईलाजाने ज्या ठिकाणी त्या काम करतात त्या ठिकाणचे शिळे अन्न, चप्पल जोड्या फाटके कपडे यावर आपला उदरनिर्वाह चालवावा लागतो. सहा तासापासून 10 ते 12 तासांपर्यंत काम करून सुद्धा त्यांना पुरेशी मजुरी मिळत नाही. घरकाम करणाऱ्या महिलांना कोणतीही आठवड्याची सुट्टी, आजारपणाची सुट्टी किंवा प्रसूतीची सुट्टी मिळत नाही. त्यांच्या मुलांना पाळणाघर सुद्धा उपलब्ध केले जात नाही. उदाहरणार्थ, पुणे येथील अप्पर इंदिरा नगर परिसरात मोठ्या संख्येने बिगारी कामगार व घरकामगार राहतात. दिवसभर मालकिणीकडे धुणी-भांडी करून थकून मग घरी येऊन घरातली कामे उरकणे हाच घरकामगार महिलांचा दिनक्रम. घरात शक्यतो शिक्षण घेणारी लहान मुले आणि दारू पिणारा नवरा अशीच परिस्थिती सगळीकडे असल्यामुळे आपल्यावर आलेली वेळ आपल्या मुलांवर येऊ नये यासाठी त्या झटपटत असतात. बहुतांश घरकामगारांच्या कमाईवरच कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असतो. मग यासाठी मालकिणीसमोर कितीही हाजी-हाजी करावी लागली, कितीही गुलामीत दिवस काढावे लागले तरी चालेल पण घर सुरळीत चालले पाहिजे असल्या परिस्थितीत ते आपले दिवस काढत असतात. कोणीही मालक कधीही घरकामगाराला सांगू शकतो की उद्यापासून तू कामावर येऊ नको आणि बदल्यात त्यांना कोणतीही रक्कम नुकसानभरपाई (हर्जाना) म्हणून द्यावी लागत नाही. घरकामगारांच्या वेतनासंदर्भात सुद्धा कुठले नियम नाहीत की कोणतेही कायदे नाहीत वा रोजगाराचे कोणतेही संरक्षण नाही. अशा प्रकारचे अत्यंत असुरक्षित हे काम आहे.

दुष्काळात तेरावा महिना अशाप्रकारे स्थिती कोरोनाच्या बंधनांमुळे घरकामगारांची झाली. मागील गेले चार ते पाच महिन्यापासून घरकामगार महिला लॉकडाऊनमुळे कामावर जाऊ शकल्या नाहीत. या काळात लादलेल्या निर्बंधांमुळे घरकामगार महिलांच्या कुटुंबांची दैन्यावस्था झाली आहे. लॉकडाऊनच्या काळात शासनाने विविध बंधने घालून कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांची आणि प्रत्येक कामाच्या ठिकाणी कामगारांची संख्या कमी करण्यावर भर दिला. ज्यांना 'वर्क फ्रॉम होम' शक्य आहे अशा पांढरपेशा, आयटी उद्योगासारख्या क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची किंवा सरकारी कर्मचाऱ्यांची चलती झाली, पण ज्यांना कामावर जाणे भागच आहे अशा असंघटित क्षेत्रात काम करणारे कामगार, घरकाम करणाऱ्या महिला यांच्यावर उपासमारीची वेळ आली. पुण्यासारख्या शहरात सुमारे १ लाखापेक्षा अधिक घरकाम करणाऱ्या महिला असून त्या विविध ठिकाणी काम करत असल्याने घरमालकांनी कोरोनाचा संसर्ग होण्याच्या भीतीने अनेक ठिकाणी त्यांना सुटी दिल्याचे दिसून आले. यामुळे जवळपास ७० टक्के कामगार महिलांना फटका बसला.

आधीच वाईट असलेल्या या परिस्थितीत कोरोना विषाणूने थैमान घातले आणि समस्या आणखीनच बिकट झाली. सरकारने टाळेबंदी जाहीर करताच सोसायट्या व बंगल्यातील मालकिणींनी आपापल्या मोलकरणींना सांगितले कि उद्यापासून कामावर येऊ नका. गरज वाटल्यास आम्ही फोन करून बोलवून घेऊ. चार-पाच महिने काळ अनेक मालकिणीला फोन कधी करावासा वाटलाच नाही. फक्त स्वतःची गरज म्हणून नसू द्या पण आपल्याकडे काम करणाऱ्या मोलकरीणीकडे काम बंद असताना घरात चूल पेटतेय कि नाही याची थोडी दखलसुद्धा द्यावीशी वाटली नाही. सरकारने आश्वासन दिले होते की लॉकडाऊनच्या काळात सर्वांना तीन महिन्याचे राशन पोहचवू पण वास्तवात आज सुद्धा कित्येकांना फक्त एक महिन्याचे राशन मिळाले व काहींना ते सुद्धा नाही. काम नसल्यामुळे आपले घर कस चालवायचं? कुठे राहायचं? मुलांचं शिक्षण कस करायचं? व त्यासोबतच काम नाही तर चार महिन्याचे लाईट बिल कुठून भरणार? चार महिन्याचे घरभाडे कसे भरणार? घरात अँड्रॉईड मोबाईल नसताना सरकारने केलेल्या ऑनलाईन शिक्षणाचा भार कसा उचलणार? घरात अन्नाचा कण नसताना पोटाची भूक कशी भागवणार? या सर्व प्रश्नांची उत्तरं होती उपासमार, काळोख, शिक्षणाचा खेळखंडोबा, रस्त्यावर फेकले जाणे, उधार-उसनवारी-कर्ज!

इतर सर्व कामगारांप्रमाणेच घरकामगारांच्या रक्त आणि घामाच्या शोषणातून चालते ही भांडवली व्यवस्था. कोरोना सारख्या साथींमध्ये तिचे सर्वात क्रूर रुप दिसून येते. अत्याधिक असुरक्षित आणि असंघटीत क्षेत्रातील घरकामगारांनी संघटीत होणे आणि न्यायपूर्ण जीवनासाठी, कायदेशीर अधिकार मिळवण्यासाठी व नफ्याच्या व्यवस्थेला संपवण्यासाठी संघर्ष करणे हाच मार्ग शिल्लक आहे.

---

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

•रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
• अहमदनगर - 9156323976, 9657590491
• पुणे - 9422308125

---

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

---

### बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704 (पर्यायी नंबर 9619039793)**

---


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | सोमनाथ केंजळे, सत्यनारायण |
| संपादकीय कार्यालय | : | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 9156323976, 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |


---



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

# पुण्यात चौगुले इंडस्ट्रीमध्ये कामगारांचा प्रदीर्घ लढा: एक शिकवण

✍ बिगुल पत्रकार

पुण्यामध्ये मुख्यालय असलेल्या चौगुले इंडस्ट्रीज मधील कामगार जवळपास एका दशकापेक्षा जास्त काळ आपल्या मागण्यांना घेऊन संघटीत होऊन संघर्ष करत आहेत. मारुती गाड्यांची विक्री आणि सर्व्हिसिंगच्या कामातील ही एक मोठी कंपनी. परंतु अनेक वर्षे संघर्ष करूनही कामगारांना कंपनीचे मालक, सरकारी यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेकडून निराशा सोडून अजूनही हाती काही पडलेले नाही. भांड्वलशाहीमध्ये कशाप्रकारे सर्व यंत्रणा भांडवलदार वर्गाच्याच बाजूने काम करतात हे या उदाहरणावरून प्रकर्षाने दिसून येते.

कंपनीच्या कामगारांशी बोलले असता खालील तथ्ये समोर आली आहेत. गेली अनेक वर्षे कंपनीकडून किमान वेतन कायदा, कॉंट्रॅक्ट कायदा, पीएफ, फॅक्टरी कायदा, ईएसआय, लेबर वेलफेअर फंड इत्यादी सर्व बाबींमध्ये धांदली केली जात आहे. किमान वेतन सुद्धा दिले जात नाही असे कंपनी प्रशासनाला सुनावल्यानंतर मोहन बोरुडे यांना कामावरून काढून टाकण्यात आले. यावर कामगारांनी काम बंद आंदोलन केल्यानंतर खोटे आश्वासन देऊन कंपनी प्रशासनाने काम पुन्हा चालू करवले.

यानंतर मालकांनी कॉंग्रेस प्रणीत भांडवली कामगार संघटना असलेल्या 'राष्ट्रीय मजदूर संघा'ला हाताशी धरून स्वत:च्या मर्जीतील संघट्ना निर्माण करण्याचा 2011 मध्ये प्रयत्न केला. संघटनेला 1 वर्षात मान्यताही दिली गेली. परंतु संघटनेचे मालकधार्जिणे चारित्र्य लक्षात आल्यामुळे कामगारांनी पुन्हा आपली स्वतंत्र संघटना बनवण्याचा निर्णय घेतला. या संघटनेला मान्यता मिळवायला मात्र 4 वर्षे प्रयत्न करावे लागले. मालकधार्जिण्या भांडवली युनियनसोबत कामगार नसूनही मालकांनी मात्र त्यांच्याशीच वाटाघाटी करण्याची भुमिका घेतली. शेवटी दीर्घ न्यायालयीन लढाईनंतर 2015 मध्ये रामसं च्या कामगार संघटनेची मान्यता रद्द केली गेली.

2013 साली कामगारांनी आपले मागणीपत्र कामगार आयुक्तांकडे सादर केले. यावर आज 2020 मध्ये सुद्धा निर्णय झालेला नाही. मधल्या काळामध्ये मान्यताप्राप्त युनियनशी बोलण्याच्या बहाण्याने कंपनीनेही मान्यतापत्रावर मौन साधले. कामगारांनी निषेध केल्यावर युनियनच्या 13 पदाधिकाऱ्यांना सस्पेंड केले गेले आणि चौकशीचा फार्स करुन कामावरूनही काढले गेले. 2019 साली युनियनची मान्यता मिळाल्यानंतर समारंभ झाला असता, अचानक कंपनीला साक्षात्कार झाला की 10-15 वर्षे काम करणारे कामगार हळू काम करतात आणि अनेकांना पुन्हा कामावरून काढले गेले.

2016 साली पुन्हा एकदा न्यायालयीन लढाई लढल्यानंतरच न्यायालयाने कामगारांच्या मागणीपत्रावर कारवाईचे आदेश दिले, परंतु पुर्णत: अंमलबजावणी अजूनही झालेली नाही. कंपनी किमान वेतन सुद्धा देत नाही यावर कामगार आयुक्तांकडे तक्रार दाखल केली गेली. परंतु कायद्यातील पळवाटांचा फायदा घेऊन फक्त 1200-2500 रुपये दंड भरत मालकांनी कामगारांना किमान पेक्षाही कमी वेतनात काम करवून पिळवणे चालूच ठेवले आहे! या संदर्भात 2014 साली पुन्हा न्यायालयामध्ये दाखल केलेली याचिका 2020 सालापर्यंत अजूनही प्रलंबित ठेवण्यात आली आहे. कंपनीने पगारासोबतच पीएफ सुद्धा कमीच जमा केले आहेत आणि ईएसआय सुविधा जवळपास एकाही कामगाराला दिली जात नाही. सर्व कायदे धाब्यावर बसवून अशाप्रकारे कंपनीचा कारभार चालूच आहे.

2019 मध्ये कामगारांनी मोठे ठिय्या आंदोलन केले, अर्धनग्न आंदोलन केले, घंटा आंदोलन केले आणि शासनाकडे दाद मागितली. ठिय्या आंदोलना कोरोनाचे संकट येईपर्यंत चालू होते. त्यानंतर अजूनही कोणतीही ठोस कारवाई होऊन कामगारांपर्यंत न्याय पोहोचलेला नाही.

या अनुभवातून दिसून येते की भांडवली पक्षांच्या युनियन्स मालकांसाठीच काम करतात, सरकारी अधिकारी मालकांच्या हितामध्येच दिरंगाई करतात, कायदे असे बनलेले आहेत की नाममात्र दंड भरून मालक कामगारांचे शोषण चालूच ठेवू शकतात आणि न्यायालयीन प्रक्रिया अशी की आयुष्य संपून जाईल पण कामगारांना न्याय मिळणार नाही. ही आहे भांडवली व्यवस्था जिची संरचनाच अशी आहे की कामगार वर्ग न्यायाची अपेक्षाच करू शकत नाही. चौगुले इंडस्ट्रीज मधील कामगारांचा संघर्ष न हारता अजूनही चालूच आहे. व्यापक कामगार वर्गाने या आंदोलनाला साथ देणे गरजेचे आहे.

# कोरोना महामारीत मनरेगाची दुरावस्था

✍ बबन

कोविड-19 अर्थातच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशस्तरावर लॉकडाऊनची घोषणा 24 मार्च 2020 रोजी करण्यात आली. यानंतर कोट्यवधी कामगार शहरांकडून गावांकडे स्थलांतरित झाले आणि बेरोजगारीची भयंकर समस्या निर्माण झालेली आहे. गावांकडे स्थलांतरित कामगारांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना म्हणजे मनरेगा योजनेअंतर्गत काम दिले जात असल्याचा मोठमोठ्या वल्गना मोदी सरकार करत आहे, परंतू खरे चित्र मात्र वेगळेच आहे.

24 मार्चला मोदीने लॉकडाऊन ची घोषणा केल्यानंतर त्यांच्या भाषणात मनरेगा (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) बद्दल कोणतीही मुद्दे उपस्थित केलेले नव्हते. लॉकडाउनच्या काळात मनरेगा योजने अंतर्गत काम मिळेल की नाही हेसुद्धा सुरुवातीला सांगितले नव्हते. अनेक राज्यांनी त्यामुळे मनरेगाची कामे रोखून धरली होती. कारण मनरेगा या योजनेची भाजप सरकारने या अगोदर किती खिल्ली उडवली आहे हे सर्वांनाच माहीत आहे. पण पुढे याच योजनेचे गुणगान करत सरकारने 15 एप्रिलला असे स्पष्ट केले की, इच्छुक कामगारांना 20 एप्रिलपासून मनरेगा अंतर्गत रोजगार मिळेल. कसा व कधी याविषयी स्पष्ट धोरण तेव्हा सुद्धा नव्हते आणि आजही नाही. पुढे अर्थ मंत्री निर्मला सीतारामन यांनी मनरेगाच्या रोजंदारी मध्ये 20 रुपयांनी वाढ केली जाईल असे स्पष्ट केले. खरंतर प्रत्येक वर्षी ही वाढ नियमित केली जाते, तेव्हा या घोषणेत फक्त विनाकारण श्रेय घेणे सोडून नवीन असे काही नव्हते. सीतारामन यांनी असे सुद्धा सांगितले की देशातील पाच कोटी कुटुंबांना याचा सरळसरळ फायदा होईल पण एप्रिलच्या आकडेवारीनुसार पाच कोटी पैकी फक्त 6.8 टक्के एवढ्याच कुटुंबांना याचा फायदा झाला असे अर्थशास्त्रज्ञ जीन ड्रेझ यांनी दाखवून दिले आहे.

पुढे एप्रिलच्या अखेरीस मनरेगाअंतर्गत स्थानांतरित होऊन गावाकडे परत गेलेल्या कामगारांना रोजगार मिळावा यासाठी जेव्हा दबाव वाढत जात होता तेव्हा सरकारने एक लाख कोटी रुपयांच्या योजनेची घोषणा केली. 4 ऑगस्टपर्यंतची स्थिती अशी होती की एकूण एक लाख कोटी पैकी 48,759 कोटी रुपये म्हणजेच जवळजवळ अर्धी रक्कमच खर्च झाली आहे. सप्टेंबर 2020च्या आकडेवारी नुसार एप्रिल-सप्टेंबर दरम्यान देशभरात 83लाख नवीन कामगारांनी काम मागण्यासाठी नोंदणी केली आहे. देशस्तरावर एकूण मनरेगा कार्ड धारकांचा आकडा 14 कोटी 36 लाख इतका झाला आहे. जो मागील सात वर्षात सर्वात जास्त आहे. यात मागील पाच महिन्यात सर्वात जास्त महिला कामगारांनी कामाची मागणी केली आहे. ज्याचे प्रमाण 52.46 टक्के एवढे आहे. आकडा मोठा दिसत असला, तरी जमिनीवरचे वास्तव तपासणे गरजेचे आहे.

ग्रामपंचायतीकडून प्रत्येक वेळेस ग्रामसभा घेऊन कामे व त्यांची यादी जाहीर केली जाते. बहुसंख्य ठिकाणी ह्या याद्या प्रमाणे कामे आता संपलेली आहेत. त्या याद्या अजून देखील नव्याने बनलेल्या नाहीत. काही राज्यांनी या योजनेला लागू करून दिलेला निधी खर्च केला तर काही राज्यांनी ह्या योजना अजूनसुद्धा व्यवस्थित पद्धतीने चालविलेच नाहीत. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये, ज्यामध्ये प्रामुख्याने हिंगोली, वाशिम, परभणी, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर अशा जिल्ह्यांचा समावेश आहे, तेथे फक्त नाममात्र पद्धतीने हे काम सुरू आहे. वास्तविक पाहता जमिनी स्तरावर मनरेगाची बहुतेक कामे आता बंद आहेत. त्याला कारण सांगताना असे सांगितले जाते की, मान्सून सुरू झाल्यामुळे ही काम सुरू नाहीत. खरंतर मान्सून सुरू झाल्यानंतर सुद्धा रोजगाराची मागणी थांबलेली नाही पण मनरेगाअंतर्गत सरकारी स्तरावर त्याचा वेग अतिशय मंदावला आहे. झारखंड सारख्या राज्याने तर 200 एकर जमिनीवर वृक्ष लागवड सारखे कार्यक्रम जाहीर करून सुद्धा कार्यान्वित केलेले नाहीत. उत्तर प्रदेश सारख्या राज्यांमधून अशा अनेक बातम्या आहेत ज्यामध्ये काम बंद आहे पण कामाचे बिल मात्र काढले जात आहे. अहमदपूर, मुरादाबाद या ठिकाणी तर नागरिकांनी रस्त्यांच्या कामांमध्ये भ्रष्टाचार व वेतन वेळेवर न केल्यामुळे आंदोलने देखील केली आहेत. झाशी मध्ये 33 हजार मजुरांना पंधरा दिवसापासून मजुरी देण्यात आलेली नाही. नियम असे सांगतो की, रोस्टर तयार झाल्यानंतर आठ दिवसाच्या आत वेतन देणे अनिवार्य आहे पण या ठिकाणी असे होत नाही. 33 हजार मजुरांचे एकूण 10 कोटी रुपये एवढे कामाचे पैसे अडकून पडले आहेत. त्यामुळे अनेक कामगार जे रोजगाराच्या शोधात मनरेगा योजनेकडे वळले होते ते नाईलाजाने मनरेगा सोडून पुन्हा शहराकडे धाव घेण्याच्या प्रयत्नात आहेत. अनेक राज्यांमध्ये तर मनरेगाची कामगिरी व अंमलबजावणी ही फार निराशजनक आहे त्यामध्ये झारखंड, महाराष्ट्र अशा राज्यांचा समावेश आहे.

खरेतर मनरेगा मध्ये फक्त 100 दिवसांचा रोजगार दिला जातो, जो अत्यंत अपुरा आहे. रोजगाराचा अर्थच आहे की तो रोज म्हणजेच वर्षभर नियमित मिळाला पाहिजे. एका सर्वेक्षणामध्ये 3,196लोकांनी सांगितले की लॉकडाउनच्या सुरुवातीच्या काळातच 90 टक्के लोकांचा आर्थिक स्त्रोत बंद पडलेला आहे, 43 टक्के लोकांकडे एक दिवसाचे सुद्धा राशन नाही, 31 टक्के लोकांकडे जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी घेतलेले कर्ज देण्यासाठी रोजगार नसल्यामुळे पैसेच नाहीत.

इतर क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे ग्रामीण भागातील मजुरांचा ओढा हा मनरेगा योजनेकडे वळला. परंतु सीएमआयई च्या आकडेवारीनुसार मार्च 2020 मध्ये ग्रामीण भागात बेरोजगारी दर हा 8.49 टक्के होता, तर सरकारी धोरणामुळे एप्रिलमध्ये हा दर वाढून शहरी भागात 23.52 तर ग्रामीण भागात 22.89 टक्क्यांपर्यंत वाढला होता. अजुनही ही भयावह परिस्थिती बऱ्यापैकी कायम आहे. शहरी आणि ग्रामीण भागात रोजगार मिळणे फार गरजेचे आहे पण भांडवलदारांच्या नफ्याचे रक्षण करण्यात गुंतलेल्या सरकारला याची पर्वा असणे शक्य नाही.

आज शहरी आणि ग्रामीण भागात बेरोजगारी आणि उपासमारीचे चित्र फार भयावह आहे अशात शहरी आणि ग्रामीण भागात लोकांना वर्षाचे 365 दिवस काम मिळाले पाहिजे आणि ही जबाबदारी सरकारचीच बनते. रोजगाराचा अधिकार हा माणसाच्या जगण्यासाठीची मूलभूत शर्त आहे या अधिकाराला आज मूलभूत अधिकार बनवण्यासाठीच्या संघर्षाची गरज कोरोना महामारीच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## हाथरस, बलरामपूर, कठुआ, उन्नाव, खैरलांजी... वाढते स्त्री अत्याचार कधी थांबणार?

# स्त्री मुक्तीची कास धरा! भांडवली पितृसत्तेला गाडून टाका!

✍ पूजा

उत्तरप्रदेशातील हाथरस आणि बलरामपुर येथे झालेल्या बलात्कार आणि खूनाच्या प्रकरणांनंतर स्त्री-अत्याचारांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे आणि बऱ्याच चर्चा होत आहेत. स्त्री अत्याचाराच्या प्रश्नाला मुलभूत अर्थाने समजून घेतल्याशिवाय आणि संरचनात्मक परिवर्तनांशिवाय अशा घटना थांबू शकत नाहीत हे समजून घेणे आवश्यक आहे.

घरात-घराबाहेर-कामाच्या ठिकाणी, कपडे अंगभर असोत की लांडे फ्रॉक किंवा अगदी बुरखा सुद्धा, दिवस असो वा रात्र, गाव असो वा शहर आणि वय कितीही असो, स्त्रीवर अत्याचार सर्वत्र होताना दिसतात आणि दिवसेंदिवस या अत्याचारांचे स्वरूप जास्त अमानवीय होताना दिसत आहे. भारतात तर योगी-मोदी सरकार सत्तेत आल्यापासून दलित, महिला, अल्पसंख्यांकांवरचे अत्याचार करायला जणू काही जणांना खुले परवानेच दिले गेले आहेत. उत्तरप्रदेशामध्ये झालेली हाथरसची घटना, अत्यंत अमानवी, क्रूर पण अशा अपराधांची ही प्रातिनिधिक केस.

भाजपच्या योगी आदित्यनाथांच्या उत्तरप्रदेशामध्ये हाथरस येथील बलात्कार आणि खुनाचे प्रकरण देशभर चर्चिले जात आहे. 14 सप्टेंबर रोजी आई आणि भावासोबत सरपण गोळा करण्यास गेलेली मनिषा पुन्हा घरी आलीच नाही. सवर्ण जातीतील चार जणांनी जातीय आकस आणि वासनेपायी तिच्यावर बलात्कार करून तिला ठार मारले. बाजरीच्या शेतात तिला फरफटत ओढत नेऊन तिच्यावर फक्त सामुहिक बलात्कार केला नाही, तर तिची जीभ छाटली, आणि तिच्या पाठीचे मणके तोडून तिला अधू केले. आईने शोधल्यानंतर ती रक्ताच्या थारोळ्यातच आढळली. दोन आठवड्यांच्या झुंझीनंतर दिल्लीतील सफदरजंग हॉस्पिटलमध्ये तीने जीव सोडला. या घटनेनंतर 2 दिवसांच्या आत बलात्काराच्या चाचणीसाठी नमुने देणे अपेक्षित असतानाही योगी सरकारच्या पोलिसांनी तब्बल 11 दिवसांनी हे नमुने दिले. इतकेच नाही तर मनिषाचा जीव गेल्यानंतर घाईघाईने रात्री 2:30 वाजता तिच्या घरच्यांनाही न कळवता पोलिसांनी परस्पर मृतदेहाला अग्नी देऊन टाकला. एफ.आय.आर. दाखल झाल्यावर सुरुवातीचे दहा दिवस तर कोणालाही अटक झालीच नाही. मीडियाला सुद्धा अनेक दिवस मनिषाच्या गावात पोलिसांनी जाऊ दिले नाही. बलात्कार झालाच नाही अशा प्रकारचे दावे सुद्धा अनेक भाजप नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी खोट्या बातम्यांच्या आधारे करण्याचा प्रयत्न केला. हे स्पष्ट आहे की उत्तर प्रदेश सरकारने पोलिसांमार्फत विविध मार्गांनी आरोपींना वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत.

'बेटी-बचाओ, बेटी-पढाओ' असा नारा देणाऱ्या भाजपचे खरे चरित्र सुद्धा अशा घटनांमधून सतत समोर आले आहे. स्वत: योगी आदित्यनाथाने ठाकुरांचे रक्त गरम असते आणि त्यांच्याकडून चुका होऊ शकतात असे निर्लज्ज विधान केले होते. या अगोदरही कठुआ किंवा उन्नाओ सारख्या बलात्काराच्या घटनांवेळी भाजपच्या नेत्यांनी आरोपींच्या समर्थनात वक्तव्यच नाही तर कुलदिप सिंह सेंगर, स्वामी चिन्मयानंद, कठुआ बलात्कारातील आरोपींसाठी जाहीर भुमिका घेणे आणि मोर्चे सुद्धा काढल्याचे दिसून आले आहे. 43 टक्के आमदार-खासदारांवर बलात्कार-उत्पीडनाचे खटले असलेल्या सरकारांकडून इतर काही अपेक्षा केलीही जाऊ शकत नाही. खरे तर भाजप काय, कॉंगेस काय, अशा सर्वच पक्षांनी गुन्हेगार, बलात्काऱ्यांना निवडणुकीत तिकीटे दिल्याची उदाहरणे अनेक आहेत. आपापल्या पक्षाच्या बलात्कारी नेत्यांना वाचवण्यात आणि अशा लोकांना पक्षात आश्रय देण्यात सर्वच भांडवली पक्ष पुढे राहिले आहेत, समाजवादी पक्षाचे उत्तरप्रदेशातील अनुप संदा, आसाममधील कॉंग्रेसचे नेते बिक्रम सिंह ब्रह्मा, युवक कॉंग्रेसचे महाराष्ट्रातील रोहित टिळक, कॉंग्रेसचे केरळमधील एम व्हिंसेंट वा पी पी बाबू, मध्य प्रदेश कॉंग्रेसचे हेमंत कटारे अशी नजिकच्या काळातील अनेक नेत्यांची नावे बलात्काराच्या आरोपामध्ये समोर आली आहेत. परंतू कुलदिप सिंह सेंगर, स्वामी चिन्मयानंद, मध्य प्रदेशातील भोजपाल सिंह, दिल्लीतील विजय जॉली, महाराष्ट्र भाजपचे रविंद्र बावनथडे, पश्चिम बंगाल भाजपचे अनिसुर रहमान, वेंकटेश मौर्य, हामिद सरदार, राजस्थानचे निहाल चंद, प्रमोद गुप्ता, शांतिलाल सोळंकी-गोविंद पुरशुरामी-अजित रामवानी-वसंत भानुशाली हे गँगरेपचे आरोपी नेते, अशी भाजपच्या नेत्यांच्या नावांची यादी फारच मोठी आहे. निश्चितपणे बलात्काऱ्यांना संरक्षण देण्याच्या स्पर्धेत भाजप इतर पक्षांच्या फार पुढे आहे.

असेही दिसून येते की नफ्याचे दलाल असलेल्या सर्वच पक्षांचे अनेक नेते स्त्री-अत्याचाराकरिता स्त्रियांनाच दोषी ठरवण्यातही पुढे आहेत. आरोपीच्या समर्थनामध्ये किंवा पीडीत स्त्रिच्या किंवा एकंदरीतच स्त्रियांच्या विरोधामध्ये वक्तव्ये करण्यात किंवा आणि आपल्या पुरुषी अहंकाराचे प्रदर्शन घडवण्यात सुद्धा सर्वपक्षीय नेत्यांमध्ये स्पर्धा आहे. भाजपचे हरियाणाचे रामवीर भट्टी 2017 मध्ये म्हणाले होते की जर मुली रात्री बाहेर जातील तर त्यांना छेडले जाईलच; कर्नाटकचे गृहमंत्री के जे जॉर्ज 2015 मध्ये म्हणाले होते की गॅंगरेप तर तेव्हा होईल जेव्हा 4-5 लोक मिळून करतील; आर.एस.एस्. चे मोहन भागवत 2013 मध्ये म्हणाले होते की भारतात बलात्कार होतच नाहीत, ते तर 'इंडिया'त होतात; बंगालमधील तृणमूल कॉंग्रेसचे दिपक हलदार 2014 मध्ये म्हणाले होते की जोपर्यंत पृथ्वी अस्तित्वात आहे तोपर्यंत बलात्कार होतच राहतील; समाजवादी पक्षाचे मुलायम सिंह यादव म्हणाले होते की गॅंगरेपच्या बहुतेक तक्रारी खोट्या असतात; हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर म्हणाले होते की जर स्त्रियांनी 'चांगले' कपडे घातले तर पुरुष त्यांच्याकडे वाईट नजरेने पाहणार नाहीत, इत्यादी. अशी वक्तव्ये करण्यात महिला नेत्याही मागे नाहीत. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या आशा निरजे यांनी 2014 मध्ये प्रश्न विचारला होता की (दिल्लीतील बलात्कार पीडीत) निर्भया रात्री 11 वाजता सिनेमाला गेलीच का? अशा वक्तव्यांची फक्त यादी बनवायला गेली तर प्रचंड मोठी होईल. थोडक्यात स्त्री अत्याचारा करिता स्त्रिलाच दोषी ठरवण्याची पद्धत सर्व पक्षीय नेत्यांमध्ये सतत दिसून येते. परंतु स्त्री अत्याचाराच्या प्रश्नाला मुळापासून सोडवायचे असेल तर आपल्याला मात्र मुलगामी तपास करण्याशिवाय पर्याय नाही.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी संस्था (एन.सी.आर.बी.) नुसार 2019 मध्ये दरदिवशी बलात्काराचे 88 गुन्हे नोंदवले गेले. यामध्ये राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, हरियाणा आणि छत्तीसगड राज्य अग्रस्थानी आहेत. विकासाचे नकली ढोल बडवणाऱ्या प्रधानमंत्री मोदींच्या राज्यात दर 16 मिनिटाला एक बलात्कार होतो. आणि हे आकडे तर हिमनगाचे टोक आहे. काही अभ्यासांनुसार 71 टक्के बलात्काराच्या घटनांमध्ये तर गुन्हा नोंदवला सुद्धा जात नाही. दिवसेंदिवस वाढणाऱ्या या घटनांना फक्त पारंपारिक पुरुषसत्तेच्या विश्लेषणाने समजून घेणे पुरेसे नाही.

इतिहासात मागे वळून पाहिल्यास दिसेल की जोपर्यंत मनुष्य आदिम अवस्थेत टोळी करून रहात होते तोपर्यंत उपलब्ध सर्व स्त्रोतांवरून असेच दिसते की बहुतांश ठिकाणी स्त्रीप्रधान समाजच अस्तित्वात होते. स्त्रियांच्या गुलामीची, स्त्री असमानतेची सुरुवात होतेच ती मुळी अतिरिक्त उत्पादन, त्यातून खाजगी संपत्तीची निर्मिती आणि खाजगी संपत्तीच्या वारशाचा प्रश्न उपस्थित झाल्यावर लग्न आणि कुटूंबसंस्थेच्या निर्मितीपासून. स्त्रीला उत्पन्नाच्या स्त्रोतांपासून वंचित करून, सामाजिक-धार्मिक रुढी तिच्यावर लादुन सर्वत्र तिला चूल-मूल मध्ये अडकावण्याचे काम पुरुषसत्तेने केले. स्त्री ही उपभोगाचे आणि मूल जन्माला घालण्याचे साधन असून पुरुषवर्गाची सेवा करणे हेच तिचे कर्तव्य आहे, स्त्रीवर कोणत्यातरी पुरुषाचा अधिकार असतोच त्यामुळेच स्त्रीची योनिशुचिता अत्यंत महत्वाची आहे, अशाप्रकारच्या पुरुषसत्ताक विचारांची निर्मिती स्त्री वर्गाच्या ऐतिहासिक पराजयानंतर झाली. बलात्कारासारख्या हिंसेच्या घटनेला स्त्री करिता लांछनास्पद मानले जाते कारण स्त्रीच्या योनीवर पुरुषाचा अधिकार आहे ही पुरुषसत्ताक मानसिकता आजही प्रभावी आहे. स्त्री अत्याचारांमागे पुरुष स्त्रीवर अधिकार गाजवू शकतो ही पुरुषसत्तेची मानसिकता काम करत असते, आणि ती जात-धर्मांपलीकडे सर्वत्र दिसून येते. मुलीला गर्भातच मारून टाकणे असो, हुंडा आणि हुंडाबळी असोत, वा कन्यादानासारख्या लज्जास्पद प्रथा, या सर्व स्त्रीवर्गावर पुरुषवर्गाच्या मालकीच्याच प्रतिक आहेत. जोपर्यंत अशा सर्व प्रथा अस्तित्वात आहेत तोपर्यंत स्त्रीवर अधिकार गाजवण्याची कल्पना अत्याचारांना जन्म देतच राहिल. स्त्रीवर पुरुषाच्या अधिकाराच्या कल्पनेला आह्वान दिल्याशिवाय स्त्री अत्याचारांवर खऱ्या अर्थाने नियंत्रण आणता येईल ही कल्पना फोल आहे. स्त्री अत्याचारांवर उत्तर स्त्रियांवर बंधने नसून स्त्री मुक्ती, स्त्री पुरुष समानता हेच आहे.

परंतु फक्त परंपरेने चालत आलेली पितृसत्ताक मानसिकता या वाढत्या अत्याचारांना कारणीभूत आहे असे मानले तर ती भयंकर मोठी चूक ठरेल. शत्रूची स्पष्ट ओळख असल्याशिवाय कोणताही संघर्ष जिंकता येणे शक्य नाही. स्त्री विरोधी गुन्ह्यांचे वर्गीय विश्लेषण आणि भांडवली उत्पादन पद्धतीने या गुन्ह्यांना दिलेली चालना लक्षात घेणे आवश्यक आहे.

भांडवली समाजाने स्त्री-पुरुषांना स्वतंत्र कामगार बनवताना मर्यादित स्वातंत्र्य दिले खरी, परंतु याच भांडवली समाजाने, जो खाजगी संपत्ती आणि नफ्यावर आधारित आहे, स्त्रीमुक्तीच्या मार्गात असे अडसर निर्माण करून ठेवले आहेत जे फक्त भांडवलशाहीला संपवूनच हटवले जाऊ शकतात. भांडवलशाही ज्याप्रमाणे प्रत्येक वस्तू 'विक्रेय' बनवते, मानवी श्रमशक्ती सुद्धा विक्रेय बनवते, तसेच ती जाहिराती, वेश्याव्यवसाय, पोर्नोग्राफीचा धंदा, सिनेमातील 'आयटम' सॉंग म्हटली जाणारी अश्लील गाणी, अशा माध्यमांमधून स्त्रीदेहाला सुद्धा विक्रेय आणि उपभोगाची वस्तू म्हणूनच सतत समोर आणत राहते. वाढत्या बलात्कारांमागे अशा बाजारू प्रचारामुळे वाढणारी बिभत्सतेची मानसिकता हे सुद्धा महत्वाचे कारण आहे. नफ्याच्या या व्यवस्थेने जी प्रचंड बेरोजगारी निर्माण केली आहे ती स्त्री वर्गाला सुद्धा खऱ्या अर्थाने स्वत:च्या पायावर उभे राहण्याची शक्ती देत नाही, अशी शक्ती जी खऱ्या अर्थाने स्त्रीच्या स्वतंत्र नागरिक म्हणून जीवन जगण्याची पूर्वशर्त आहे. आणि म्हणूनच स्त्री-वर्गाचे ऐतिहासिक दास्यत्व पूर्णपणे तोडण्यात भांडवलशाही कधीही यशस्वी होऊ शकत नाही.

1990 पासून भारतात सुरू झालेल्या उदारीकरणाच्या प्रक्रियेने समाजामध्ये प्रस्थापित बिभत्स पुरुषसत्ताकतेला नवीन आयाम प्राप्त करून दिले आहेत आणि असे वर्ग पैदा केले आहेत जे समाजातील सांस्कृतिक अध:पतनाचे प्रतिनिधित्व करतात; जे भांडवली प्रसारमाध्यमांमधून होणाऱ्या अश्लिल प्रचाराचे वाहक आणि समर्थक वर्ग आहेत. पैशांचा माज असलेला एक नवधनाढ्य वर्ग ज्याला वाटते की पैशाने काहीही विकत घेता येते, शहरांमध्ये जमिनींचे व्यवहार करून ऐतखाऊ पद्धतीने झटपट श्रीमंत झालेला वर्ग, विविध प्रकारच्या दलाल्या करणारा एक वर्ग, आयटी मध्ये झटपट पैसे कमावलेला आणि पूर्णत: चंगळवादी झालेला एक वर्ग, ग्रामीण भागात पूर्वापारपणे गावात सत्ता गाजवणारा जमिनधारक वर्ग जो आज भांडवली शेती करून नफेखोरी करतो, इतकेच नाही तर या नवधनाढ्य वर्गाने फेकलेल्या भिकेच्या तुकड्यांवर जगणारा एक पतित, लंपट, चमचेगिरी करणारा, दलाली करणारा, गुलामी मानसिकतेचा सर्वहारा वर्ग ज्याची वर्गचेतना कामगार वर्गीय राहिलेली नाही अशा सर्व वर्गांमध्ये मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक चेतनेचे अध:पतन होऊन एक लंपट, उपभोगवादी आणि म्हणूनच अधिक स्त्रीविरोधी, पुरुषसत्तावादी प्रवृत्ती बळावताना दिसून येते.

त्यामुळे हे समजणे आवश्यक आहे की भांडवलशाहीने स्त्रीयांच्या गुलामीला एक नवीन रुप दिले आहे. पितृसत्तेविरोधात संघर्ष करत असताना आज भांडवली व्यवस्थेविरोधात, भांडवली मूल्य मान्यतांविरोधात, स्त्रीला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य देऊ शकेल अशा व्यवस्थेच्या निर्मितीसाठी संघर्ष अनिवार्य आहे. भारतात भांडवलशाही क्रांतिकारी नव्हे तर एका क्रमिक संथ प्रक्रियेने स्थापित झाली आणि त्यामुळेच तिने पूर्वापार चालत आलेल्या सामंती पितृसत्ताक मुल्यांशी तसा निकराचा संघर्षही केला नाही जो युरोपातील भांडवलशाहीने केला. त्यामुळेच भारतीय समाजामध्ये पुरुषसत्तेची मुळे अजून खोलवर रुजलेली आढळतात. स्त्री अत्याचारांना खऱ्या अर्थाने तोंड द्यायचे असेल तर आपल्याला स्त्रिला दुय्यम स्थान देणाऱ्या रुढी-परंपरा, स्त्रीविरोधी मान्यता आणि विचार, भांडवलशाही व्यवस्था या सर्वांविरोधात एक झुंझार क्रांतिकारी लढा उभा करावा लागेल.

### शिक्षणाची गाडी चालली

✍ ज्योति म्हापसेकर

शिक्षणाची गाडी चालली, शिक्षणाची गाडी चालली  
पैसेवाल्या पोरांनी जागा बळकावली  
गरिबांची पोरं बघा कशी खाली राहिली  
मुली कितीक चढती निम्म्या खाली उतरती,  
शिक्षणाची गाडी चालली ...

वाटेत येती बाई ही किती जंक्शनं  
कधी पैसा आणि विघ्न कधी मधे येई लग्न  
मुली कितीक चढती निम्म्या खाली उतरती,  
शिक्षणाची गाडी चालली ...

लाडकी ही मैनी म्हणं, आई साळंत घाल गं मला  
लई वाटतं ग मैने मला, पण मी जाते मजुरीला  
तू गेलीस साळंत तर, कोण बघंल धाकल्याला  
मैनी रडली धाई धाई, काय करू मी बाई  
शिक्षणाची गाडी धाड धाड घरावरून जाई  
माझी मैनी घरातच राहिली, शिक्षणाची गाडी चालली ...

# मोदी सरकारचे नवीन शिक्षण धोरण: कामगारांच्या शिक्षणाच्या संधींवर अजून एक हल्ला

✍ **प्रवीण एकडे**

'कोरोना संकटाचे संधीत परिवर्तन' करून मोदी सरकारच्या कॅबिनेट ने नवीन शिक्षण धोरण 2020 ला मंजुरी दिली आहे. के कस्तुरीरंगन यांच्या नेतृत्वात बनलेल्या कमिटी ने तयार केलेल्या मसुद्याच्या आधारावर नवे शिक्षण धोरण बनवण्यात आले आहे. 1968 साली पहिले शिक्षण धोरण बनले होते त्यानंतर 1986 मध्ये राजीव गांधी सरकारने दुसरे शिक्षण धोरण बनवले आता मोदी सरकारच्या कॅबिनेट ने मंजुरी दिलेले शिक्षण धोरण हे तिसरे शिक्षण धोरण आहे. भांडवलशाही मध्ये भांडवलदार वर्गाच्या बदलत्या परिस्थिती नुसार गरजांची प्राथमिकता बदलत जाते आणि त्या बदललेल्या परिस्थिती नुसार भांडवलदारांद्वारे नियंत्रित सरकारांची धोरणे बनवली जातात. नवीन शिक्षण धोरण याला अपवाद नाही.

1986 च्या शिक्षण धोरणाने ज्याला 1992 मध्ये खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या ( खाउजा ) नितीनुसार संशोधित केल्या गेले त्या धोरणाने शिक्षणाच्या व्यापारीकरणाचा मार्ग खुला केला. याबाबतीत नवीन शिक्षण धोरण अजून पुढचे पाऊल आहे. नवीन शिक्षण धोरण शिक्षणाला व्यापारीकरणाच्या सीमेपर्यंत पोहोचवते. या धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात सरकारी गुंतवणूक अजून कमी होऊन खाजगी भांडवलाची गुंतवणूक वाढणार आहे. विदेशी भांडवलदार भारतातील शिक्षण क्षेत्रात आता गुंतवणूक करू शकणार आहेत. ज्यांच्याकडे पैसे आहेत तेच यापुढे शिक्षण घेऊ शकतील. कामगार कष्टकरी वर्गातील मुलांना शिक्षण मिळवणे अजून कठीण होणार आहे. नवीन शिक्षण धोरणात सरकारने जनतेला फसवण्यासाठी अनेक दावे केले आहेत. पण धोरणाचा नीट अभ्यास केला तर सरकारने केलेल्या दाव्यांमधील फसवेगिरी आपल्या लक्षात येईल.

नवीन शिक्षण धोरणात शिक्षणावर देशाच्या सकल उत्पादनाच्या (जीडीपीच्या) 6 टक्के आणि केंद्रीय बजेटचा 10 टक्के खर्च करण्याची घोषणा केली आहे. हा दावा करताना सरकारने निधी कशा उभा होईल आणि हा खर्च कसा करण्यात येईल याचे स्पष्टीकरण देणे गरजेचे समजले नाही. शिक्षणावर सरकारी खर्च वाढवण्याचे मोदी सरकारने सत्तेत आल्या पासून अनेकदा बोलले आहे. परंतु इतर अनेक जुमल्यांप्रमाणेच हा सुद्धा एक जुमलाच आहे. 2014 पासूनच्या केंद्रीय बजेट चे आकडे बघितले तर लक्षात येते की आता पर्यंत मोदी सरकारने कधीही शिक्षणावर जीडीपी च्या 1 टक्के सुद्धा खर्च केलेले नाही. या उलट 2014 पासून शिक्षणाचे बजेट सतत कमी करण्यात आले आहे. 2014 साली मोदी सरकारचे शिक्षणाचे बजेट जीडीपी च्या 0.55टक्के होते ते कमी करून 2019 ला 0.44टक्के करण्यात आले. केंद्र आणि राज्य सरकार मिळून 2019 साली जीडीपी च्या फक्त 2.99टक्के खर्च करण्यात आले होते. सरकारने घोषित केलेले शिक्षणावरील बजेट सुद्धा पूर्ण खर्च केले जात नाही. सेन्टर फॉर मोनिटरिंग ऑफ इंडियन इकॉनॉमी ( CMIE ) च्या जुलै 2019 च्या आकडेवारीनुसार 2014 पासून मोदी सरकारने शिक्षणावर खर्च करण्यासाठी घोषित केलेल्या बजेट मधील 4 लाख कोटी खर्चच केले नाहीत. यावरून शिक्षण धोरणात शिक्षणावरील खर्चाचे केले गेलेले दावे किती फसवे आहेत हे लक्षात येते.

नव्या शिक्षण धोरणात 2030 पर्यंत 100टक्के साक्षरता मिळवण्याचे ध्येय ठेवले आहे. देशात 30 कोटी पेक्षा जास्त लोक निरक्षर असल्याचे हे धोरण मानते. सरकारच्या दाव्याचा आणि सरकारच्या धोरणाचा आपण विचार करु तेव्हा यातील विसंगती आपल्या लक्षात येईल. एक तर नवे शिक्षण धोरण 100टक्के साक्षरता प्राप्त कसे करेल याची काहीच उपाययोजना देत नाही. शाळेत 50 पेक्षा कमी मुले असतील तर शाळा बंद करण्याचे निर्देश नवीन शिक्षण धोरणात दिले आहेत. शाळांना टाळे ठोकून 100टक्के साक्षरता प्राप्त करण्याचे ध्येय ठेवणे एक चमत्कारच आहे आणि असा चमत्कार फक्त मोदी सरकारच करू शकते! 100 टक्के साक्षरता प्राप्त करायची असेल तर शाळांची संख्या वाढवावी लागेल परंतु सरकार इथे शाळाच बंद करण्याच्या मार्गावर आहे. शाळा, महाविद्यालयांचे मोठे समूह/संकुल तयार करण्याच्या नावाखाली छोट्या शाळा आणि महाविद्यालय बंद करण्याच्या तयारीत मोदी सरकार आहे. सरकारची दुतोंडी भूमिका यातून स्पष्ट होते. याहीपलीकडे जाऊन 'साक्षरता' हे उद्दिष्टच कसे असू शकते हा प्रश्न विचारला गेला पाहिजे. स्वातंत्र्य मिळून 73 वर्षे उलटून गेलेली असताना, भारताला 'विश्वगुरू' बनवण्याच्या वल्गना करणारे हे सरकार प्रत्येक मुला-मुलीला केजी-ते-पीजी मोफत, गुणवत्तापूर्ण, समान शिक्षणाचे नाही तर फक्त 'साक्षरते'चे उद्दिष्ट ठेवते यातूनच दिसून येते की यांची शिक्षणाबद्दल प्राथमिकता किती आहे.

नवीन शिक्षण धोरणात उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमांची पुनर्रचना करण्यात आली आहे. पदवी अभ्यासक्रम आता चार वर्षांचा असेल. शिक्षण धोरणाच्या मसुद्यानुसार 'मल्टीएंट्री मल्टीएक्झिट पॉईंट' ची तरतूद करण्यात आली आहे. म्हणजे जर विद्यार्थी काही कारणांमुळे अभ्यासक्रम पूर्ण करू शकला नाही तर त्याला पहिले वर्ष पूर्ण केल्या नंतर सर्टिफिकेट, दोन वर्षानंतर डिप्लोमा आणि तीन वर्षानंतर डिग्री दिली जाईल. 'मल्टीइंट्री मल्टीएक्झिट' ची तरतूद शिक्षणामध्ये अगोदरच असलेली श्रेणीयुक्त असमानता वाढवणार आहे. शिक्षण अर्ध्यातच कोण सोडतात? अर्थातच गरिब, कष्टकरी, कामगार घरातून येणारी मुलं-मुली. त्यामुळे आता ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती चांगली असेल तेच डिग्री मिळवू शकतील कामगार, कष्टकरी वर्गातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट, डिप्लोमा वर समाधान मानावे लागेल. सरकारच्याच आकडेवारीनुसार भारतात 18 ते 23 वयोगटातील फक्त 26.36टक्के तरुणच उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतात. या विद्यार्थ्यांपैकी असंख्य विद्यार्थी आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे आपला अभ्यासक्रम पूर्ण न करताच 'ड्रॉप आऊट' होतात म्हणजे शिक्षण सोडतात. नवीन शिक्षण धोरण 18 ते 23 वयोगटातील उरलेल्या 73.64टक्के विद्यार्थ्यांना जे विविध सामाजिक आर्थिक कारणांमुळे उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रवेश सुद्धा घेऊ शकत नाही त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये 'ड्रॉप आऊटस' ची संख्या कमी करण्यासाठी काहीच उपाय योजना देत नाही. विद्यार्थी ज्या कारणांमुळे आपले शिक्षण पूर्ण करु शकत नाही त्या कारणांचे समाधान सरकारने शोधायला हवे होते. 'मल्टीएंट्री मल्टीएक्झिट पॉईंट' ची तरतूद करून 'ड्रॉप आऊटस' ला शैक्षणिक मान्यता देण्याचेच काम नवीन धोरण करते. एम.ए करण्याचा कालावधी एक वर्ष केला आहे आणि एम.फील चा अभ्यासक्रम पूर्णपणे समाप्त करण्यात आला आहे. या पुढे एम.फील न करता 4 वर्षाचे डिग्री आणि एक वर्षाचे पदव्युत्तर शिक्षण ( पोस्ट ग्रॅज्युएशन ) पूर्ण करून पीएचडी करता येईल. अशाप्रकारच्या अभ्यासक्रमांच्या बदललेल्या संरचनेमुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर घातक प्रभाव पडणार आहे.

भारतातील 100 विद्यापीठांमध्ये ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्याचे दिशानिर्देश शिक्षण धोरणात दिले आहेत. नोव्हेंबर 2019 पर्यंत भारतात इंटरनेट ची व्याप्ती फक्त 40टक्के आहे आणि यातही शहरी आणि ग्रामीण भागातील इंटरनेट व्याप्ती मध्ये प्रचंड तफावत आहे. शिक्षण धोरणात इंटरनेट व्याप्ती वाढवण्याबद्दल काहीच बोलल्या गेलेले नाही. ऑनलाइन शिक्षण घेण्यासाठी स्मार्टफोन, इंटरनेट यांसारखी साधने लागतात. ही साधने विकत घेण्याचा भार विद्यार्थ्यांवरच टाकण्यात आला आहे. यामुळे कामगार कष्टकरी वर्गातून येणारे विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणासाठी लागणाऱ्या साधनांच्या अभावी शिक्षणापासूनच वंचित राहतील. ऑनलाइन शिक्षणावर भर देऊन सरकार शिक्षणावरील खर्चाच्या आपल्या जबाबदारीतून पळ काढत आहे.

शिक्षण धोरणाच्या मसुद्यात इयत्ता सहावी पासूनच व्यावसायिक शिक्षण देण्याचे बोलले गेले आहे. इयत्ता सहावी पासून व्यावसायिक शिक्षण देणे म्हणजे भांडवलदारांसाठी कमी मजुरीत काम करणाऱ्या कामगारांची फौज तयार करण्याचे काम लहान वयापासूनच सुरू करणे आहे. शालेय शिक्षण मुलांसाठी ज्ञानाचा अथांग सागर खुला करण्यासाठी, त्यांना समाजातील वास्तवाची जाणीव करून देण्यासाठी, त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी दिल्या गेले पाहिजे. नवीन शिक्षण धोरण मात्र मुलांकडे फक्त भविष्यातील कामगार म्हणून बघत आहे. शिक्षणाच्या अधिकारांतर्गत सरकार आता 3 ते 18 वयोगटातील मुलांना निशुल्क शिक्षण देण्याचे बोलते. खरे तर या तरतुदीमागे आर्थिक पाठबळच नाही म्हणून ती जुमलाच आहे आणि वयाची मर्यादा न ठेवता सरकारने नर्सरी पासून ते पीएचडी पर्यंतचे शिक्षण निशुल्क दिले पाहिजे. नवीन शिक्षण धोरणात दिलेल्या आकडेवारीनुसार शालेय स्तरावर 10 लाख शिक्षक कमी आहेत. या 10 लाख जागा भरण्याबद्दल शिक्षण धोरण गप्प बसले आहे. सरकार शिक्षकांविनाच शाळा चालवणार आहे का? एकीकडे 3 ते 18 वयोगटातील मुलांना निशुल्क शिक्षण देण्याचे बोलायचे आणि दुसऱ्या बाजूला रिकाम्या असलेल्या शिक्षकांच्या जागा भरण्या बाबत काहीच बोलायचे नाही. एकंदरीतच नवीन शिक्षण धोरणात शब्दांची फक्त फेकाफेकच करण्यात आली आहे ते सत्यात उतरवण्यासाठी काही ठोस उपाययोजना धोरणात नाही.

या धोरणानुसार सरकार विद्यापीठांना आर्थिक स्वायत्तता देण्यात येणार आहे या स्वायत्ततेचा अर्थ आहे यापुढे विद्यापीठांना सरकारकडून निधी मिळणार नाही. विद्यापीठांना आपला निधी अभ्यासक्रमांची फी वाढवून, स्ववित्तपोशीत अभ्यासक्रमांमध्ये वाढ करून किंवा इतर मार्गांनी उभा करावा लागेल. कामगार कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा घाट मोदी सरकारने घातला आहे. विद्यापीठांना पायाभूत सुविधा उभ्या करण्यासाठी उच्च शिक्षणासाठी वित्तपुरवठा एजंसी (हायर एज्युकेशन फंडिंग एजंसी, एच.ई.एफ.ए.) ची स्थापना करण्यात आली आहे. एच.ई.एफ.ए. चं काम आहे विद्यापीठांना कर्ज देणं जे विद्यापीठांनी 10 वर्षाच्या आत फेडायचे आहे. यापुढे विद्यापीठांना पायाभूत सुविधा सुधारायच्या असतील तर त्याचाही भार विद्यार्थ्यांवरच पडणार आहे. कुठल्याही सरकारची जबादारी असते की त्यांनी सार्वजनिक शिक्षण संस्थाच्या पायाभूत सुविधा सुधाराव्यात परंतु मोदी सरकार मात्र एच.ई.एफ.ए. च्या माध्यमातून ही जबाबदारी झटकून टाकताना दिसत आहे.

नवीन शिक्षण धोरण शिक्षणात सार्वजनिक आणि उदारवादी/परोपकारी व्यक्तींच्या भागीदारी ( पब्लिक फिलॉंथ्रोपी पार्टनरशिप) बद्दल बोलते. मोदी सरकार ने मोठ्या चलाखीने खाजगी भागीदारी ला परोपकारी/उदारवादी भागीदारी असे गोंडस नाव दिले आहे. यापुढे टाटा, अंबानी, अडाणी, अजीम प्रेमजी सारखे "परोपकारी" व्यक्ती शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक करतील आणि त्यातून नफा कमावतील. या भागीदारीचा अर्थ दुसरा तिसरा काही नसून शिक्षणाला मोठ्या खाजगी भांडवलाच्या हातात देणे आहे. अभ्यासक्रमांमध्ये बदल करण्याचे दिशानिर्देश नवीन धोरणात आहेत. राष्ट्रवाद शिकवण्याच्या नावाखाली विद्यार्थ्यांमध्ये सांप्रदायिक विष पसरवण्याचे काम मोदी सरकार करणार आहे. नैतिक मूल्य शिकवण्याच्या नावाखाली अज्ञानता पसरवल्या जाईल. शिक्षण क्षेत्राला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हातात देऊन शिक्षणाचे भगवीकरण करण्याचा मोदी सरकारचा इरादा यातून स्पष्ट आहे.

नवीन शिक्षण धोरणानुसार "राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाण परिषद" शिक्षण संस्थांचे मूल्यांकन करणार नाही. शालेय आणि उच्च शिक्षण संस्थांना स्वमूल्यांकन करण्याचा अधिकार नवीन शिक्षण धोरणाच्या माध्यमातून दिला गेला आहे. खरेतर मूल्यांकनाची पद्धत हीच शिक्षणाच्या बाजारीकरणाची एक महत्वाची अट आहे, कारण बाजारात मालाची प्रतवारी ठरवावी लागते आणि शिक्षणसंस्थांचे मूल्यांकन नेमके हेच करते. आता राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाण परिषदेचे शिक्षण संस्थांवरील नियंत्रण कमी केल्यामुळे शिक्षण संस्थांना विद्यार्थ्यांची लूट करण्याची सरकारने अजून एका प्रकारे मोकळीक दिली आहे. खाजगी मूल्यांकनाला कुणीही विकत घेऊ शकते. कुठल्याही प्रकारची गुणवत्ता तसेच पायाभूत सुविधा न सुधारता विद्यार्थ्यांकडून पैसा लाटण्याचा मार्ग आता शिक्षण संस्थांना मोकळा झाला आहे. शिक्षण व्यवस्थेचे नियमन करण्याच्या जबाबदारीतुन स्वतःला मुक्त करून मोदी सरकारने शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्याचा केलेला दावा किती फसवा आहे हे सिद्ध होते. आपलीच वही आणि आपलाच हिशोब च्या धर्तीवर सरकारने हा निर्णय घेतला आहे. येणाऱ्या काळात शिक्षणाच्या गुणवत्तेवर याचा घातक परिणाम दिसेल. खरेतर सर्वच शिक्षण संस्था सारख्या दर्जाच्या होतील अशाप्रकारचे धोरण आखले जाणे आवश्यक आहे परंतु मूल्यांकनासारखी अशी सर्व धोरणे विषमता वाढवणारीच आहेत.

नवीन शिक्षण धोरणाने 1986 च्या शिक्षण धोरणाच्या शिक्षणाच्या व्यापारीकरणाच्या प्रक्रियेला आता खूप दूरवर पोहचवले आहे. तिन्ही शिक्षण धोरणांचा आपण नीट अभ्यास केला तर आपल्याला लक्षात येईल की बदलणाऱ्या परिस्थितीला अनुरूप भांडवलदारांच्या नफा वाढवण्यासाठीच्या गरजा लक्षात घेऊन शिक्षण धोरणात सुद्धा बदल केल्या गेला आहे. नवीन शिक्षण धोरण आधीच्या दोन्ही शिक्षण धोरणांपेक्षा या मुळे जास्त घातक आहे की हे नवीन धोरण व्यवस्थेचे स्वरूप बदलण्याच्या नावाखाली शिक्षणाचे भगवीकरण करून विद्यार्थ्यांमध्ये फॅसिस्ट विचारधारा पसरवण्याचे काम करणार आहे. 2014 मध्ये सत्तेत आलेल्या मोदी सरकारचे एकमेव काम आहे कामगारांच्या श्रमाच्या लुटीतून भांडवलदारांचा नफा वाढवणे. ही लूट खंड न पडता निरंतर सुरू राहावी यासाठीच आता नवीन धोरणाच्या माध्यमातून शिक्षण व्यवस्थेची दारे मोठ्या भांडवलासाठी खुली करण्यात आली आहेत. या लुटीचा विद्यार्थी वर्गाकडून विरोध होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासक्रमाचे स्वरूप बदलण्याच्या नावाखाली सांप्रदायिक विचार पसरवण्याचे काम मोदी सरकार करत आहे. जेणेकरून विद्यार्थी सुद्धा जाती, धर्माच्या नावाखाली एकमेकांचे डोके फोडतील आणि त्याचा फायदा भांडवलदार वर्ग आपला नफ्याचा दर वाढवण्यासाठी करून घेईल.

एकंदरीतच नवीन शिक्षण धोरण व्यापक जनतेला शिक्षणापासून दूर करण्याचे धोरण आहे. नवीन शिक्षण धोरणातील तरतुदींमुळे शिक्षणाची गुणवत्ता ढासळणार आहे. आधीच असमान असलेल्या शिक्षणाच्या संधींना अजून असमान बनवण्याची, उद्योगपती व्यापाऱ्यांना शिक्षणाच्या धंद्याची खुली सूट देण्याची मोदी सरकारची ही नवीन योजना आहे.

# शेती संबंधी तीन कायद्यांचे वास्तव जाणून घ्या!

**पान 1 वरून**

त्यांना पाठिंबा देणाऱ्या उदारवादी, सामाजिक-जनवादी सामाजिक संघटनांनी चालवलेल्या आंदोलनाच्या केंद्रस्थानी जो मुद्दा आहे तो आहे **किमान हमी भावाचा. म्हणून या मुद्द्याला खोलवर तपासणे आवश्यक आहे.**

**किमान हमी भावाचा प्रश्न: हा फक्त धनिक शेतमालकांचा प्रश्न आहे!**

सर्वप्रथम हे समजून घेऊयात की 'शेतकरी' या एका शब्दामध्ये शेती व्यवसायाशी संबंधित अनेकांना गुंडाळून घेऊन जे भ्रामक विचार मांडले जातात ते दूर केले गेले पाहिजेत. गुणात्मकरित्या अल्पभूधारक शेतकरी, मध्यम भू-धारक शेतकरी, धनिक शेतकरी ह्यांच्यात फरक आहे. अल्पभूधारक शेतकरी हा स्वत: शेतावर जाऊन राबतो तर मध्यम आणि धनिक शेतकरी मुख्यत्वे शेतमजुरांकरवी उत्पादन करवून घेतात आणि स्वत: उत्पादन प्रक्रियेमध्ये सामील नसतात. गावाकडे असणारा धनिक शेतकरी (Capitalist Farmer Land Lord) हा अनेकदा स्वत: शेतीच्या प्रक्रियेमध्ये लक्ष घालत असला तरी श्रम मात्र करत नाही. ज्यांना 'कुलक' म्हटले जाते, त्यांच्याकरिता तर शेत'करी' शब्द सुद्धा खूप दूरचा आहे कारण कुलक हा मुख्यत्वे भांडवली भाडेवसुलीवर जगणारा शेतकरी (Capitalist Rentier Land Lord)आहे. शेतीमध्ये उत्पादन करणाऱ्या ज्या वर्गाबद्दल सध्या चालू असलेल्या आंदोलनात सर्वत्र चुप्पी आहे तो आहे शेतमजूर वर्ग, जो शहरी कामगाराप्रमाणेच पण शेतावर मोलमजुरी करून आपले घर चालवतो आणि शेती उत्पादनावर त्याचा काही एक अधिकार नसतो.

नकली डाव्यांपासून जवळपास सर्वच भांडवली पक्ष किमान हमी भावाच्या समर्थनामध्ये उभे ठाकले आहेत. परंतु शेतमालाला भावाची हमी दिल्यामुळे फक्त 4 ते 6 टक्के धनिक शेतकरी आणि शेतमालकांचा फायदा होतो आणि गरिब शेतकऱ्यांना फायदा होतच नाही उलट शेतमजूर, शहरी कामगारांना महागाई सहन करावी लागते. कसे ते समजून घेऊयात.

हमी भावाचे समर्थक किंवा नवीन कायद्यांचे समर्थक या दोघात एक गोष्ट समान आहे ती म्हणजे हे दोघेही शेतमालासाठी बाजाराच्या व्यवस्थेचेच समर्थक आहेत. त्यांच्यात वाद इतकाच आहे की बाजारावर नियंत्रण मोठमोठ्या कंपन्यांचे असावे की आडते-व्यापारी यांचे. थोडक्यात हमी भावाच्या खाली असो किंवा वर, शेतमालाचा भाव तर बाजारातच ठरणार आहे. आता सर्वात प्रथम हे समजणे आवश्यक आहे की किमान हमी भावामुळे शेतमालाचा भाव बाजारात वाढणार हे निश्चित. सरकारने एक किमान भाव ठरवला असेल तर बाजारात त्या मालाची किंमत त्यापेक्षा जास्तच राहण्याची मोठी शक्यता बनते. थोडक्यात अन्न-धान्याची महागाई होणार. एवढेच नाही तर ती सर्व उत्पादने सुद्धा महाग होणार जी कृषी मालापासून बनतात. यामध्ये अशा अनेक वस्तू येतात जी देशातील कष्टकरी जनता विकत घेते. त्यामुळे या महागाईमुळे कामगार वर्गाचे, गरिब कष्टकरी वर्गाचे नुकसानच होणार हे निश्चित.

2013 मध्ये झालेल्या एका राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणानुसार देशातील एक तृतीयांश शेतकऱ्यांकडे 1 एकर (0.4 हेक्टर) पेक्षा कमी जमीन आहे. असे सर्व गरिब शेतकरी आपल्या एकूण कमाईचा फक्त सहावा हिस्सा म्हणजे जवळपास 16 टक्के शेतीतून कमावतात तर बाकीचा हिस्सा मजुरी करूनच कमावतात. याशिवाय एक तृतीयांश शेतकऱ्यांकडे 1 ते 2.5 एकर (0.4 ते 1 हेक्टर) जमीन आहे. यांच्या कमाईचा 40 टक्के हिस्सा शेतीतून तर बाकी मजुरी करून येतो. हे दोन्ही मिळून एकूण शेतकरी संख्येच्या, दोन तृतीयांशाच्या जवळपास, 70 टक्के आहेत. देशातील 92 टक्के शेतकऱ्यांकडे 5 एकर (2 हेक्टर) पेक्षा कमी जमीन आहे, म्हणजेच ते गरिब, अतिगरिब किंवा परिघावरचे शेतकरी आहेत. छोट्या शेतकऱ्यांच्या मोठ्या हिश्श्याला हा भ्रम आहे की हमीभावामुळे त्यालाही काही फायदा होईल, पण वास्तवात तसे काही होऊ शकत नाही.

शेतमालाला हमी भाव मिळाला तर छोट्या शेतकऱ्यांना त्याचा काय फायदा? हे शेतकरी जे स्वत: मजुरी सुद्धा करतात, आणि ज्यांच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा मजुरीतून येतो, ते बाजारात जेवढे विकतात त्यापेक्षा जास्त स्वत:च्या जीवनाच्या गरजा भागवायला विकत घेतात, आणि त्यामुळेच हमी भाव वाढून झालेल्या महागाईचा यांना फटकाच बसणार आहे, फायदा होणार नाही!

दुसरीकडे गरिब शेतकऱ्याला आपल्या शेतीच्या व्यवसायाला चालवण्यासाठी संस्थागत कर्ज सुद्धा सहज मिळत नाही आणि त्यांना धनिक शेतकरी, कुलक आणि आडत्यांकडून कर्ज घ्यावे लागते. माल कृषी उत्पन्न बाजार समितीत विकणे, किंवा बाजारात विकणे, त्यासाठी होणारा वाहतूक खर्च, भाव मिळेपर्यंत तग धरण्याची तयारी हे सर्व लहान शेतकऱ्याला पुरेशा भांडवला अभावी शक्य होत नाही. त्यामुळे ग्रामीण धनिक शेतकरी, कुलकरुपी 'सावकार' गरिब शेतकऱ्यांवर दबाव ठेवून असतात आणि अनेक ठिकाणी त्यांचा माल हे हमीभावा पेक्षा कमी दराने विकत घेतात आणि स्वत: मात्र हमी भावाला विकून नफा कमावतात.

हमी भावाचा फायदा फक्त धनिक शेतकरी, कुलकांना मिळतो. देशातील एकूण शेतकऱ्यांपैकी फक्त 4.1 टक्के शेतकरी आहेत ज्यांच्याकडे 10 एकर (4 हेक्टर) पेक्षा जास्त जमीन आहे. यांच्यापैकी अनेकांना खरे तर शेत'करी' न म्हणता शेत'मालक'च म्हटले पाहिजे कारण ते फक्त दुसऱ्यांकडून काम करवून घेतात, स्वत: करत नाहीत. या वर्गाच्या उत्पन्नाचा तीन चतुर्थांश भाग शेतीतून येतो आणि बाकी हिस्सा सुद्धा येतो तो सावकारी, व्याज या मार्गाने. हा तोच वर्ग आहे जो कोणताही कर भरत नाही, ज्यांना सर्व कर्जमाफीच्या योजनांचा मोठा लाभही मिळतो आणि खऱ्या अर्थाने हमी भावाचा फायदा सुद्धा. **या शेतमालकांच्या जमिनींवर मेहनत करणारा शेतमजूर आणि गरिब शेतकरी हेच आज खऱ्या अर्थाने देशाचे अन्नदाता आहेत.**

शांता कुमार समितीच्या मते फक्त 5.8 टक्के शेतकरी आपल्या मालाला हमी भावाच्या वर विकू शकतात आणि ते सुद्धा 14 ते 35 टक्के मालच हमी भावाला विकू शकतात. थोडक्यात शेती करणाऱ्यांच्या एका फारच छोट्या हिश्श्याला हमीभावाचा फायदा मिळत आहे. म्हणजे एकीकडे धनिक शेतकरी, कुलक मिळून लहान शेतकऱ्याला सावकार बनूनही लुटतात, दुसरीकडे हमी भावाचा सर्व फायदा सुद्धा ते स्वत:च्या खिशात टाकतात.

हमीभावामुळे वाढलेल्या महागाईचा फटका एका बाजूला शहरी कामगार, शेतमजूर यांना बसतोच, शिवाय अगोदरच तुटपुंज्या असलेल्या उत्पन्नाचा मोठा भाग अन्न-धान्यावर खर्च झाल्यामुळे त्यांच्याद्वारे इतर वस्तूंची खरेदी सुद्धा कमी होते आणि अगोदरच नफ्याच्या घसरत्या दराशी झुंझत असलेल्या भांडवली व्यवस्थेपुढे विक्रीतून होणाऱ्या नफ्याच्या वास्तविकरणाचे संकटही गडद होत जाते आणि मंदीला चालना मिळते.

तेव्हा शहरी कामगार, अर्धकामगार, ग्रामीण शेतमजूर आणि अर्धकामगार या सर्वांनी हमीभावाच्या मागणीला कडाडून विरोध केला पाहिजे.

**कृषी उत्पन्न बाजार समित्या, आडते आणि व्यापारी: आम्हाला त्यांचे काय ?**

माल कुठेही विकण्याची संधी शेतकऱ्यांना दिल्यामुळे बाजार समित्या बंद पडतील आणि आडते, व्यापारी रस्त्यांवर येतील ही ओरड केली जात आहे. जेव्हा कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये हमी भावाने विक्री होते तेव्हा त्या विक्रीवर आडत लागते आणि त्यातून आडत्यांचे उत्पन्न निघते. पंजाब-हरियाणा मध्ये अशाप्रकारे आडत्यांनी गेल्या वर्षी 2000 कोटी रुपये कमावले. अनेक ठिकाणी धनिक शेतकरी अथवा त्यांचे कुटुंबीयच आडते असल्याचे दिसून येते. थोडक्यात हमी भाव, लहान शेतकऱ्याकडून सावकारी व्याज, आणि आडत या मार्गांनी एकच वर्ग कमावताना दिसतो. मजुरांच्या शोषणात स्वत: सामील असलेल्या अशा आडत्यांचा आणि व्यापाऱ्यांचा मध्यस्थीचा धंदा वाचवण्यासाठी कामगार वर्गाने का लढावे?

बाजार समित्यांमध्ये होणाऱ्या विक्रीतूनच राज्य सरकारांनाही कर मिळतो. पंजाब मध्ये गेल्या वर्षी हा कर जवळपास 3,500 कोटी रुपये मिळाला होता. या करातून ग्रामीण शेतमजूर, गरिब शेतकरी यांच्यासाठी राज्य सरकारांनी काय केले हे शोधण्याची गरज नाही कारण गरिब शेतकरी, शेतमजुराचे नागवलेले वास्तव समोर आहे. (खरेतर सरकारने उत्पनावरच्या करांसारखे प्रत्यक्ष कर वाढवले पाहिजेत, ना की शेतमालावरच्या करासारखे अप्रत्यक्ष कर, जे महागाई वाढवतात आणि गरिबांवर मोठा भार बनतात). तेव्हा कराचा मुद्दा गैरलागू आहे.

महाराष्ट्रातील शेतीमध्ये बाजाराचा नेहमीच पुरस्कार करणारी शेतकरी संघटना असो वा नकली डाव्यांची अखिल भारतीय किसान सभा. अशा सर्वांचेच एकमत आहे की किमान हमी भाव मिळत असेल तर बाजार समित्या राहिल्या काय आणि नाही राहिल्या काय! आता मोदी सरकारने पारित केलेल्या कायद्यांमध्ये हमी भावाबद्दल काहीच स्पष्टपणे बोललेले नाही आणि त्यामुळेच भाजप प्रचार करत आहे की विरोधक हमीभावाबद्दल खोटा प्रचार करत आहेत. थोडक्यात पुन्हा एकदा मुद्दा हमीभावावरच येऊन थांबतो ज्याबद्दल अगोदरच मांडणी आलेली आहे..

**कॉर्पोरेट कंपन्यांच्या हवाले कृषीक्षेत्र**

कॉर्पोरेट कंपन्यांना शेतकऱ्यांसोबत करार करायला परवानगी दिल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होईल, शेती क्षेत्रावर कॉर्पोरेट कब्जा स्थापित होईल असे म्हटले जात आहे. खरेतर फक्त कंत्राटी शेतीची पद्धत कायद्याने स्थापित झाल्यामुळे लहान आणि मध्यम शेतकऱ्याचे विशेष वेगळे काही नुकसान होणार नाहीये. या पूर्वी पासूनच कंत्राटी भांडवली शेती चालूच आहे, फक्त कंपन्या तिच्यात वाटेकरी नव्हत्या. आता लुटीच्या या व्यवस्थेमध्ये धनिक शेतकरी आणि मध्यस्थ-दलालांच्या स्पर्धेत मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्या सुद्धा उतरतील. थोडक्यात लुटीच्या वाट्यांमध्ये स्पर्धा वाढली आहे!

सुरुवातीच्या काळात कॉर्पोरेट कंपन्या जास्त भाव देऊ करतील असे शेती-बाजाराचे समर्थक सांगत आहेत. याची अनेक उदाहरणेही दिली जात आहेत, जसे पश्चिम बंगाल मध्ये पेप्सी कंपनीने बटाटा शेतकऱ्यांना प्रति किलो 5 रुपये दर जास्त देऊ केला, वगैरे. लहान आणि मध्यम शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचीही उदाहरणे समोर येत आहेत.

कॉर्पोरेट कंपन्यांच्या शेतीमध्ये प्रवेशामुळे काही प्रमाणात धनिक शेतकरी, मध्यम शेतकरी स्पर्धेत हरून त्यांचे सर्वहाराकरण होणार आहे, परंतु काही प्रमाणात जे धंद्याची गणितं योग्य आखू शकतील आणि कंपन्यांसोबत भागिदारी करू शकतील अशा काहींना फायदाही होणार आहे. शेतमजूर वर्गाला मात्र या मुळे काही फरक पडत नाही कारण धनिक शेतकऱ्याऐवजी कंपनी मालक झाल्यामुळे मजुरी बदलण्याची फार शक्यता नाही.

तेव्हा होत असलेल्या विरोधामध्ये मुख्य मामला गरिब शेतकरी आणि शेतमजूर यांचे हित नसून लुटखोर वर्गाचा भाग असलेल्या धनिक शेतकरी, आडते, इत्यादी वर्गांचे रक्षण करणे हाच मामला आहे, कारण कॉर्पोरेट कंपन्यांच्या स्पर्धेमध्ये यांचे टिकणे अवघड आहे. आता एका बाजूला लुटखोर कॉर्पोरेट कंपन्या आणि दुसऱ्या बाजूला लुटखोर धनिक भांडवलदार शेतकरी यांच्या भांडणाची चिंता कामगार-कष्टकरी वर्गाने का करावी?

**एक अप्रिय सत्य**

**भांडवली बाजारी व्यवस्थेमध्ये छोट्या शेतकऱ्याला वाचवण्याचा नारा निरर्थक आहे, प्रतिक्रियावादी आणि स्वप्नाळू आहे.** भांडवली शेतीला लागणारा प्रचंड खर्च, बाजाराचा बेभरवशीपणा, तात्कालिक नुकसान सहन करण्याची टिकण्याची क्षमता या सर्वच बाबींमुळे गरिब शेतकरी मोठ्या भांडवली शेतकऱ्याशी (मग तो गावातील स्थानिक धनिक शेतकरी वा कुलक असो वा एखादी कॉर्पोरेट कंपनी) स्पर्धा करूच शकत नाही. भांडवलशाही मध्ये स्पर्धेचा नियम साफ आहे की स्पर्धा नेहमीच मोठ्या भांडवलाला जिंकण्याची मोठी संधी देते. छोटा भांडवलदार सतत स्पर्धेत हरून कामगार वर्गाला सामील होण्याच्या वा अपवादाने जिंकून मोठा भांडवलदार होण्याच्याच प्रक्रियेत असतो. छोट्या शेतकऱ्याला सुद्धा यापेक्षा वेगळे काही भविष्य असू शकत नाही. ही गोष्ट अनेकांना अप्रिय वाटते परंतु लेनिनने सांगितल्याप्रमाणे गरिब शेतकऱ्यांना सत्य सांगितले गेले पाहिजे, ना की त्यांना भ्रमात ठेवले पाहिजे. या व्यवस्थेमध्ये गरिब शेतकऱ्यांना वाचवण्याचे खोटे आश्वासन देणे हा त्यांना दिलेला धोका आहे, अजून काही नाही. गरिब शेतकऱ्यांचे भविष्य बाजाराच्या स्पर्धेमध्ये नाही तर समाजवादी शेती व्यवस्थेमध्ये आहे. **सत्य बोलणे क्रांतिकारी असते हे सुद्धा लेनिन सांगतो** आणि प्रस्थापित भांडवली व्यवस्थेमध्ये आपली नियती ही उध्वस्त होण्याची आहे हे सत्य गरिब शेतकऱ्याने ओळखून ही व्यवस्था बदलण्याच्या क्रांतिकारी आंदोलनात सामील झाले पाहिजे.

**काळाबाजारी पासून सावध, विरोध करा! आपले वर्गहित ओळखा!**

या कायद्यांपैकी ज्या कायद्याला कामगार वर्गाने, गरिब कष्टकरी वर्गाने निकराने विरोध केला गेला पाहिजे तो आहे काळाबाजाराला परवानगी देणारा बदल. अनेक वस्तूंचा साठा करण्यावर असलेले निर्बंध या कायद्याने दूर केले जाणार आहेत. त्यामुळे महागाई वाढेलच. याशिवाय सरकारने खरेदी करून साठा केलेल्या धान्याचा वापरच राशन म्हणून केला जातो. जर सरकारने खरेदीच केली नाही तर राशन देणार कुठून? मोठमोठ्या धान्य व्यापाऱ्यांची, कंपन्यांची चांदी व्हावी म्हणून राशनची व्यवस्था संपवण्याचे, अन्न सुरक्षा संपवण्याचे नियोजन तर कॉंग्रेसच्या काळापासून चालूच आहे आणि भाजप सरकार त्याला या कायद्याद्वारे वेगाने पुढे नेत आहे. तेव्हा महागाईकडे, असुरक्षिततेकडे टाकलेले पाऊल म्हनूनही या कायद्याला आपण पाहू शकतो. म्हणून हा कायदा सरळ कामगार-कष्टकरी वर्गाच्या हितांविरोधात जातो.

**परंतु थोडं नीट बघा! आजूबाजूला चाललेल्या आंदोलनामध्ये हा मुद्दा गायबच आहे! सर्व आंदोलन चालले आहे ते धनिक शेतकऱ्याला वाचवायला!** आणि हे सगळे धनिक शेतकरी कुलक, जे वर्षानुवर्षे शेतमजुरांच्या रक्ता-घामावर मोठे झाले आहेत ते आज 'शेतकरी-कामगार' एकजुटीचे नारे देत आहेत! हे तेच धनिक शेतकरी आहेत ज्यांनी शेतमजुरांना किमान मजुरी, सुट्टी, कामाचे 8 तास, ओव्हरटाईम लागू करण्याला तर सतत विरोध केलाच आहे, उलट अनेक ठिकाणी आपापले हितसंबंधी गट बनवून जास्तीत जास्त मजुरीचे दर सुद्धा ठरवले आहेत आणि जास्त मजुरी देणाऱ्या शेतकऱ्यांना शिक्षाही सुनावत आहेत! यांच्या हितासाठी का लढावे? आज हे जो एकतेचा नारा देत आहेत तो फक्त आपल्या स्वत:च्या हितामध्ये जास्त राजकीय शक्ती गोळा करण्यासाठी आणि लाठ्या गोळ्या खाण्यासाठी कामगार-कष्टकरी वर्गाची ढाल बनवण्यासाठी आहे हे ध्यानात घ्या, सावध व्हा!

आपले वर्ग हित न समजणे आणि त्यामुळेच योग्य कार्यक्रमामागे संघटीत न होणे ही कामगार वर्गाची मोठी कमजोरी राहिली आहे. शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने कुलक-धनिक शेतकऱ्यांच्या मागे न जाता स्वत:चा स्वतंत्र राजकीय पर्याय उभा करण्याकडे पाऊल टाकणे हाच कामगार-कष्टकरी वर्गासमोर योग्य मार्ग आहे. आज श्रम प्रक्रियेत गुंतलेल्या सर्व ग्रामीण गरिबांनी **रोजगाराचा अधिकार, नियमित काम, नियमित मजुरी, पुरेसे किमान वेतन, बेरोजगारी भत्ता, आठ नव्हे तर सहा तास काम, साप्ताहिक सुट्टी, ओव्हरटाईम, ई.एस. आय., पी.एफ., सार्वत्रिक मोफत राशन सुविधा,** अशा त्या सर्व मागण्यांसाठी क्रांतिकारी आंदोलन उभे केले पाहिजे, ज्या मागण्यांसाठी शहरी मजूर लढत आहेत. ग्रामीण सर्वहारा आणि अर्धसर्वहारा यांची एकता शहरी सर्वहारा आणि अर्धसर्वहारा वर्गासोबत व्हायला हवी, धनिक शेतकरी-कुलक वर्गासोबत नव्हे!

# बाबरी मशिद विध्वंसावर कोर्टाचा निर्णय, सर्व दंगलखोर धर्मवादी फॅसिस्ट निर्दोष सुटले!

## सी.बी.आय. स्पेशल कोर्टाचा न्याय: न्यायबोधाच्या तोंडावर एक चपराक!

लखनौच्या सी.बी.आय. स्पेशल कोर्टाने बाबरी मशिद विध्वंस प्रकरणी दिलेल्या निकालामध्ये सर्व 32 जिवंत आरोपींना निर्दोष सोडले आहे. कोर्टाच्या निकालानंतर सर्व न्यायप्रिय लोकांच्या मनात हा प्रश्न उपस्थित होत आहे की जर हे कुकर्म पूर्वनिर्धारित-पूर्वनियोजित नव्हते तर मग आडवाणींच्या नेतृत्वामध्ये संघी टोळीने रथयात्रा कशाला काढली होती? जर मशिद पाडणे ठरलेले नव्हते तर मग हजारोंच्या संख्येने हातोडे, छन्नी, थाप्या, दोऱ्या, फावडे, कुदळी, इत्यादी घटनास्थळी कशी पोहोचले? जर मशिद पाडणारी ही गर्दी इतकीच अराजक होती तर संघी शिबिरांमध्ये कारसेवेच्या नावाने मशिद पाडण्याचे ट्रेनिंग कोणाचे चालले होते? जर मंचावर बसलेली भगवी टोळी उन्मादी गर्दीला शांत करत होती तर मशिदीला तूटताना पाहत "एक धक्का और दो" सारखे नारे लावत आनंदी होत मंचावर उड्या कोण मारत होतं? जर 'लिब्रहान आयोगा' पासून ते 'राम के नाम' पर्यंत उत्कृष्ठ डॉक्युमेंटरी फिल्म पर्यंत सामील असलेल्या सर्वांचे ऑडियो-व्हिडियो पुरावे दोष साबीत व्हायला अपुरे आहेत तर मग उगीचच फिरवून बोलण्यापेक्षा सरळ असेच का नाही म्हटले की संघाने केलेली धर्मवादी हिंसा ही हिंसा नाहीच! ही सुद्धा एक विडंबनाच आहे की मशिदीच्या बाबतीत फौजदारी कोर्टाचा खटला हा दिवाणी कोर्टाच्या निर्णयाच्या नंतर आला आहे. दोन्ही निर्णयांची वाट पहात 28 वर्ष निघून गेली ज्या दरम्यान अनेक आरोपी तर मरण पावले. दोन्ही निर्णयांनी सामाजिक विणीला झालेल्या जखमांना चिघळवण्याचेच काम केले आहे.

28 वर्षे अगोदर, मिरबाकी या बाबराच्या एका सरदाराने 1528 मध्ये बांधलेल्या बाबरी मशिदीला धर्मवादी फॅसिस्टांच्या नेतृत्वाखालील एका उन्मादी जमावाने पाडले. या घटनेने संपूर्ण भारतीय उपमहाद्विपामध्ये दंगलींचे वणवे पेटवले. दंगलींमध्ये हजारो निरपराध मारले गेले, लाखो विस्थापित झाले, कोट्यवधी-अब्जावधींची संपत्ती बेचिराख झाली. बाबरी मशिदीच्या विध्वंसाने भारतीय समाजाच्या विणीला आणि कष्टकरी जनतेच्या एकजुटीला भयंकर आघात पोहोचवला आहे. हे कुकृत्य भारताच्या तथाकथित लोकशाहीच्या इतिहासातील सर्वात भयंकर कृत्य होते. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने फक्त भाजपच्या कल्याण सिंह सरकारच्या भुमिकेवरच प्रश्न उपस्थित केले नाही तर सर्व माहिती असतानाही असे होऊ दिल्याबद्दल स्वत:च्याच असंगत भुमिकेला सुद्धा स्विकारले होते. नंतर बाबरी मशिद विध्वंसावर बनलेल्या लिब्रहान आयोगाने तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजप, विश्व हिंदू परिषद, शिवसेना, बजरंग दलासहीत सर्व संघी समाजविरोधी शक्तींच्या आणि त्यांच्या नेत्यांच्या भुमिकांवर प्रश्न उभे केले होते आणि मशिद पाडण्याला मोठे षडयंत्र म्हणून स्विकारले होते. ही बाब वेगळी की लिब्रहान आयोगाने केलेला तपास या मामल्यातील कोर्ट केस मध्ये रद्दीसमान सुद्धा कामाला आला नाही.




6 डिसेंबर 1992 रोजी बाबरी मशिद पाडल्यानंतर कार्टुनिस्ट मंजुळ यांनी बनवलेले कार्टून (उत्तर प्रदेशामध्ये भाजपचे कल्याण सिंह मुख्यमंत्री असताना बाबरी मशिद पाडली गेली. न्यायालयाला दिलेले आश्वासन धाब्यावर बसवत कल्याण सिंह यांच्या सरकारने बाबरी मशिद पाडली जात असताना पोलिसांना बघ्याची भुमिका घ्यायला लावली. मशिद पडल्यानंतर कल्याण सिंह यांनी 'जबाबदारी स्विकारल्याचा' कांगावा करत राजीनामा दिला.)

बाबरी मशिद विध्वंस मामल्यामध्ये वेगवेगळे एफ.आय.आर. दाखल झाले होते. या आपराधिक कुकृत्याला साकार करण्यासाठी संघी टोळी व विविध संघटनांसहीत शिवसेनेच्या 49 लोकांविरोधात एफ.आय.आर. दाखल करण्यात आला होता आणि ही केस सी.बी. आय. कडे सोपवण्यात आली होती. आता 28 वर्षे जुनी घटना आणि 28 वर्षे जुन्या केसमध्ये लखनौच्या स्पेशल सी.बी.आय. कोर्टाने निर्णय सुनावताना लालकृष्ण आडवाणी, मुरली मनोहर जोशी, उमा भारती, कल्याण सिंह, नृत्यगोपाल दास, साध्वी ऋतुंभरा सहित सर्व जिवंत 32 आरोपींना दोषमुक्त केले. बाकी 17 लोक तर न्यायव्यवस्थेच्या सुस्त कारभारामुळे निसर्गाच्या हस्तेच मरण पावले, जे भविष्यात या 32 लोकांसोबत सुद्धा होणारच आहे.

स्पेशल कोर्टाने आपला निर्णय सुनावताना म्हटले आहे की बाबरी विध्वंस सुनियोजित नव्हता. कोर्टाने म्हटले की अराजक तत्वांनी वास्तू तोडली आणि आरोपी नेत्यांनी या लोकांना थांबवण्याचा प्रयत्न केला होता. स्पेशल कोर्टाने आपल्या निर्णयामध्ये असेही म्हटले की आरोपींविरोधात पुरेसे पुरावे नाहीत तसेच सी.बी.आय. ने जमा केलेल्या ऑडिओ आणि व्हिडिओ पुराव्यांची प्रामाणिकता तपासली जाऊ शकत नाही आणि ते स्पष्ट सुद्धा नाहीत. म्हणजे या निर्णयाने कोर्टाने फक्त आरोपींना दोषमुक्तच नाही केले तर त्यांना सद्भावना प्रस्थापित करणारे शांतीदुत सुद्धा घोषित केले. आणि हे केले कसे? वैदिक हिंसा, हिंसा न भवतीच्या पद्धतीने! सी.बी.आय. च्या स्पेशल कोर्टाने 'नीरक्षीर विवेक' करताना दूध आणि पाणी वेगळे नाही केले तर काळ्याला सफेद आणि सफेदाला काळे जरूर केले आहे.

या मामल्यामध्ये निर्णय सुनावताना सी.बी. आय.कोर्टाचे स्पेशल जज एस.के. यादव एक वर्ष अगोदरच निवृत्त होणार होते पण आता ते अधिक सुखद भविष्याच्या आशेने शांततेने निवृत्त होतील.

बाबरी मशिद विध्वसाचे कुकर्म फॅसिस्ट टोळीकरिता निवडणुकांमध्ये संजीवनी सिद्ध झाले आहे. थोड्याच जागा जिंकू शकणाऱ्या भाजपला या धार्मिक हिंसेच्या या नवीन टप्प्यानंतर जागा वाढतच गेल्या आणि ही प्रक्रिया 2014 आणि 2019 पर्यंत चाललेली दिसते. बाबरी मशिदीच्या विध्वंसानंतर आलेले इतर सर्व निर्णय सुद्धा 'बहुसंख्यांकांच्या तथाकथित भावनेच्या' बाजूनेच आलेले आहेत. हे एका मोठ्या कालखंडामध्ये संघ परिवाराद्वारे न्यायपालिकेसमवेत सर्व भांडवली संस्थांमध्ये व्यवस्थितपणे केलेल्या संस्थागत फॅसिस्टीकरणाचाच परिणाम आणि परिणती आहेत. भारतात 1980 च्या दशकामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील भांडवलशाही आपल्या संतृप्त बिंदूपर्यंत पोहोचलेली होती आणि व्यवस्थेचे संकट बेरोजगारी, गरिबी आणि महागाईच्या रुपात अधिक वेगाने समोर येऊ लागले होते. कष्टकरी जनतेचे ध्यान खऱ्या समस्यांपासून भरकटवण्याचे काम नव्याने तेव्हापासूनच सुरु झाले होते. खरे तर धर्मवादी फॅसिझमचा उभार हा या अभूतपूर्व रुपात एक नवीन टप्पा होता. याचवेळी मंदिर आंदोलन सुरू झाले आणि व्यवस्थेप्रती लोकांचा राग आपापसातील द्वेषामध्ये बदलवला गेला आणि जनतेला भयंकर दंगलींच्या आगीत लोटले गेले. फॅसिस्ट सत्ता कामगारांचे एकेक अधिकार हिरावून घेत त्यांच्या रक्ता-घामानेच भांडवलदारांच्या तिजोऱ्या भरण्याचे काम करते आणि हेच काम आज भारतात होत आहे. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन कष्टकरी जनतेची ताकदच फॅसिझमला हरवू शकते आणि हरवेलही.

निश्चितपणे बाबरी मशिद विध्वंसाच्या नेत्यांना निर्दोष सोडणारा सी.बी.आय. कोर्टाचा निकाल न्यायबोधाच्या तोंडावर दिलेली जोरदार चपराक आहे आणि धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाची उडवलेली खिल्ली आहे. इतिहास या गोष्टीला लक्षात ठेवेल आणि आम्ही विश्वास ठेवतो की भविष्यात दोषींना नाही पण त्यांच्या राजकीय-वैचारिक वंशजांना शिक्षा नक्की होईल.

✍ **अनुवाद: अभिजित, साभार: मजदूर बिगुल**

## उद्धरण

माझी जीवनावर फार निष्ठा असून, मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात, व जगाला जगवतात. त्यांच्या बळावरच हे जग चालतं. त्याला विद्रूप करणं मला आवडत नाही.

✍ **अण्णा भाऊ साठे**

भारताची स्थिती आज अत्यंत दयनीय बनली आहे. एका धर्माचे अनुयायी दुसऱ्या धर्माच्या अनुयायांचे कट्टर शत्रू बनले आहेत. आता तर एका धर्माचे असणे म्हणजे दुसऱ्या धर्माचे हाडवैरी असणे असेच होऊन बसले आहे...

अशा परिस्थितीत हिंदुस्तानचे भविष्य अत्यंत अंधःकारमय दिसू लागले आहे. या 'धर्मांनी' हिंदुस्तानला संकटाच्या गर्तेत लोटले आहे. या धर्मांध दंगली भारताची पाठ कधी सोडतील, हे आज सांगता येणे कठीण आहे. जगाच्या नजरेत या दंगलींनी भारताला बदनाम केले आहे. या अंधविश्वासाच्या प्रवाहात सर्वजण वाहत चालल्याचे चित्रच आपल्याला दिसत आहे. थंड डोक्याने विचार करणारा हिंदू-मुसलमान अथवा शीख आज अपवादानेच दिसतो आहे. बाकी सगळे धर्माच्या नावाने हातात लाठ्या-काठ्या, तलवारी व सुरे घेऊन परस्परांची डोकी फोडून मरून जात आहेत. यातून वाचणारे काही फासावर जातात, तर बाकीच्यांना तुरुंगात डांबले जाते. एवढा रक्तपात झाल्यानंतर या 'धार्मिक' लोकांवर इंग्रज सरकारचा बडगा बसतो आणि मग त्यांच्या डोक्यातील किडा वळवळायचा थांबतो.

✍ **भगत सिंह**

क्रांतिकारी सर्वहाराचा मानवतावाद साधासरळ आहे. तो मानवतेबद्दलच्या प्रेमाचे सुंदर शब्दांमध्ये शाब्दिक जाळे विणत नाही. त्याचे लक्ष्य आहे जगभरातील सर्वहाराला भांडवलशाहीच्या लज्जास्पद, रक्तबंबाळ, वेडसर जोखडातून मुक्त करणे आणि मनुष्याला हे शिकवणे की त्यांनी स्वतःला विकत घेतला जाणारा आणि विकला जाणारा माल किंवा विषयासक्त लोकांच्या ऐयाशीसाठीचा कच्चा माल समजू नये. एखाद्या जख्ख म्हाताऱ्याने एखाद्या तरुण, आरोग्यवान स्त्रीवर अत्याचार करावा आणि गर्भाधान नव्हे तर म्हातारपणातील आजार तिला द्यावा, अगदी तसाच अत्याचार भांडवलशाही जगावर करीत असते. सर्वहारा मानवतावाद प्रेमाच्या विलक्षण घोषणांची मागणी करीत नाही, तो प्रत्येक कामगाराकडून आपल्या ऐतिहासिक कर्तव्याप्रति चेतनेची व सत्तेवर त्याच्या अधिकाराची अपेक्षा करतो... विषयलोलुप, परजीवी, फासिस्ट, खूनी, सर्वहारा वर्गाचे गद्दार यांच्याबद्दल तीव्र घृणेची अपेक्षा तो करतो. तो अशा लोकांबद्दल तिरस्काराची अपेक्षा करतो जे दुःखाला कारणीभूत आहेत आणि हजारो-लाखो लोकांच्या दुःखावर जे जगत आहेत.

✍ **मॅक्सिम गोर्की**

# कोरोना लॉकडाऊन मध्ये आणि नंतरही जात-धर्म-वंशवादी, अवैज्ञानिक प्रचार सुरूच

✍ रवी

लॉकडाऊनच्या सुरुवातीच्या काळात सर्व बातम्या, सोशल मीडिया आणि आपली सभांषणे कोरोनाविषाणूने व्यापली होती. सर्व जगंच ठप्प झाले होते. वृत्त वाहिन्यांनी कोरोनाविषाणू विरुद्ध एकता असल्याचे चित्र रंगवले. शारीरिक अंतर आणि स्वच्छतेचे विशेषाधिकार असो किंवा कोरोनाच्या उगमाचा प्रश्न असो, अशा सर्वच प्रश्नांमधून अनेकांचे जातीय आणि वर्गीय पूर्वाग्रह स्पष्टपणे दिसून आले. कोरोनासारख्या भीषण संकटातही जात-जमातवाद्यांनी, हिंदुत्ववाद्यांनी आपले विज्ञानविरोधी प्रचार-प्रसार करणे थांबवले नाही.

शाकाहार-मांसाहारालबद्दल शुद्ध-अशुद्धतेच्या कल्पना पूर्वीपासूनच आहेत. उदाहरणार्थ आय.आय.टी. बॉम्बे सारख्या देशातील अभियांत्रिकीमध्ये अव्वल क्रमांकाच्या संस्थेमध्ये उच्चवर्णीय विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी खाणावळीमध्ये शाकाहाऱ्यांचे जेवण बनविण्यासाठी आणि खाण्यासाठी वेगळी भांडी असावीत अशी मागणी उचलली. मांस आणि मांस खाणाऱ्यांची स्पर्शाने त्यांचे शरीर आणि मन दुषित होणार होते कि काय कोण जाणे! वास्तवात भारतात शाकाहाराचा पुरस्कार प्राण्यांची काळजी म्हणून नाही तर जातीय शुद्ध-अशुद्धतेच्या कल्पनांमुळेच जास्त केला जातो. ब्राह्मणी विचारधारे प्रमाणे शाकाहार हा शरीर आणि आत्म्याला शुद्ध ठेवतो. देवाच्या जवळ असलेले श्रेष्ठ लोक या नियमाचे काटेकोरपणे पालन करतात. भारतातील जातिव्यवस्थेमध्ये ब्राह्मण शुद्ध शाकाहार ग्रहण करतात आणि खालच्या जातीतील जनतेला अशुद्ध मानले जाते, कारण त्यांना मांसाहार करण्यास परवानगी आहे. जातिव्यवस्थेमध्ये विभागलेल्या या खानपानाच्या फरकांमुळे मांसाहाराला कारण सांगून खालच्या जातीतील लोकांना दोषी ठरवले गेले. याची अनेक उदाहरणे सोशल मीडियावर सापडतील. हा फरक करणारे फक्त अशिक्षितच नाहीत तर उच्च शिक्षित सुद्धा सापडतात.

आता तर कोरोना विषाणूच्या शोधानंतर लगेचच 'कर्तव्यदक्ष' ब्राह्मणी वर्चस्ववाद्यांनी मांसाहार करणाऱ्यांच्या अशुध्दतेला या रोगाचा स्त्रोत म्हणून जाहीर केले. या असंवेदनशीलतेचा कळस म्हणून कि काय ट्विटर नावाच्या सोशल मीडिया वर "NoMeatNoCoronavirus" (मांस नाही तर कोरोनाविषाणू नाही) असे ट्विट करून अनेकांनी जागतिक महामारीला 'उपाय'च दिला. खरे पाहता कोरोनाविषाणूच्या संपर्कात येणाऱ्या कोणालाही हा रोग होऊ शकतो. जात, धर्म किंवा अन्न न पाहता तो एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पसरू शकतो. पण अनेकांनी तर कोरोनापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी शाकाहारी व्हा असा उपदेश केला, जो पूर्णपणे चुकीचा आणि मूर्खपणाचा आहे. या खोट्या उपदेशामध्ये भर म्हणून हिंदू महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वामी चक्रपाणी यांनी जाहीर केले कि "कोरोना हा विषाणू नसून छोट्या जीवांच्या रक्षणासाठी आलेला एक अवतार आहे. त्यांना खाणाऱ्यांना मृत्यू आणि शिक्षेचा संदेश देण्यासाठी तो आला आहे. भारतीयांना विषाणूला घाबरण्याची काहीही गरज नाही; कारण ईश्वराची पूजा आणि गाईची रक्षण करण्यात विश्वास ठेवणारे भारतीय या विषाणूपासून सुरक्षित आहेत.".

समाजातील अस्पृश्यता नष्ट झाली आहे असे अनेकांना वाटत असतानांच कोरोनामुळे भारतातील उच्च जातींच्या मनामध्ये रुजलेली जातीभेदाची आणि दलित तिरस्काराची रूपे उघड उघड दिसू लागली आहेत. विजयवाड्यातील एका गावामध्ये तर दलित वस्तीमधून बाहेर पडण्यास दलितांना मनाई करण्यात आली होती आणि त्यांच्यावर पहारा ठेवण्याचे काम तेथील काही उच्चभ्रू जातीतील पुढारी करत. अनेक दिवस त्यांना भाज्या, दूध आणि औषधांविना राहावे लागले. जर तुम्हाला वाटत असेल कि हि परिस्थिती फक्त खेड्यांमध्ये आहे तर तुमचा समज चुकीचा आहे. दिल्लीमध्ये झालेल्या तबलीगी जमातीच्या धार्मिक संमेलनानंतर देशामध्ये मुस्लिमांना हिणवण्याचे हिंतुत्ववाद्यांना कारणच मिळाले. त्यानंतर अल्पसंख्यांक मुस्लिम जनतेला देशातील बहुसंख्यांक हिंदू कट्टरपंथीयांचा रोष सोसावा लागला. पाटण्यात संघी परिवाराचा भाग असलेल्या बजरंग दलच्या कार्यकर्त्यांनी हिंदूंच्या दुकानांसमोर भगवे झेंडे लावले आणि हिंदूंना आवाहन केले कि फक्त याच दुकानांमधून किराणा, भाज्या आणि फळे विकत घ्यावीत. अहमदाबादेत सरकारी दवाखान्यात हिंदू आणि मुस्लिमांसाठी वेगवेगळे वॉर्ड करण्यात आले आहेत. त्याच वेळी पालघर जिल्ह्यात झालेल्या दोन साधूंच्या मॉब-लिंचिंग घटनेला जातीयवादी रूप देण्यात आले. "८० टक्के हिंदू लोकसंख्या असलेल्या देशात हिंदूंची हत्या कशी होते?" अशा हेडलाईन्सच्या बातम्या गोदी मीडियाने अनेक दिवस चालवल्या. या प्रकरणात ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांपैकी बहुतांश जण भाजपचे कार्यकर्ते होते, या तथ्यांवर मात्र पडदा टाकण्यात आला.

कोरोनाविषाणूचा उगम चीनमध्ये झाल्याने संपूर्ण जगामध्येच पूर्व आशियायी देशांतील नागरिकांना वर्णद्वेषी भेदभावाला सामोरे जावे लागले. भारतामध्येही अशा प्रकारच्या वर्णद्वेषाचा सामना उत्तर पूर्व भारतीयांना करावा लागला. अशीच एक घटना मुंबई मध्ये घडली. टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टी.आय.एस. एस.) येथील एका नागालँड मधील विद्यार्थिनीला ती राहत असलेल्या इमारतीच्या भागातील एका स्थानिक इसमाने तिला घराबाहेर काढल्याची धक्कादायक घटना समोर आली. ती महिला चिनी असून कोरोनाविषाणूने ग्रासली आहे असा त्याचा समज झाला होता. उत्तर पूर्व राज्यांमधील भारतीयांना आणि चिनी जनतेला हिणवणारे अनेक संदेश सोशल मीडियावर आणि व्हाट्सऍप वर फिरवले गेले. एवढेच नाही तर अनेकांनी चिनी खाद्य पदार्थांवर सुद्धा आक्षेप घेतला. परंतु असा वंश-वर्णद्वेष करणारे हा विषाणू भारतात येईपर्यंत आणि आल्यानंतरसुद्धा निष्क्रिय राहिलेल्या सरकारला मात्र अजिबात दोषी मानताना दिसत नाहीत.

भारतीय समाजामध्ये रुजलेले धार्मिक-जातीय-वांशिक भेदभाव अशाप्रकारे कोरोनासारख्या आपत्तीमध्येही लोकांना रोगाची वैज्ञानिक माहिती मिळण्यापासून, योग्य इलाजाकडे जाण्यापासून फक्त रोखत नाहीत तर कामगार-वर्गीय जनतेमध्ये दुही माजवण्याचे काम सुद्धा करतात आणि पर्यायाने सत्ताधाऱ्यांना त्यांच्या चुकांपासून मुक्त करण्याचेच काम करतात.

# कामगारांच्या स्वस्त होत चाललेल्या मरणाला जबाबदार कोण?

✍ बबन ठोके

1 सप्टेंबर 2020 रोजी राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरो (एन.सी.आर.बी., NCRB) कडून 'अपराध आणि आत्महत्या' संबंधित माहिती असलेला अहवाल नेहमी प्रमाणे सार्वजनिक करण्यात आला. याच रिपोर्ट मध्ये एक भाग असा देखील आहे ज्यात ' भारतात दुर्घटनेमुळे मृत्यू आणि आत्महत्या' (accidental deaths and suicide's in India) या संबंधी स्वतंत्र माहिती दिली आहे. या रिपोर्ट नुसार 2019 मध्ये 139,123 आत्महत्या झाल्याच्या नोंदी आहेत. हे आकडे 2018 च्या तुलनेत 5,000 ने जास्त आहेत.

एन.सी.आर.बी. अहवालातील आकड्यांनुसार आत्महत्या करणाऱ्या व्यक्ती पैकी प्रत्येकी चौथा व्यक्ती हा असंघटित क्षेत्रातील कामगार, मजूर आहे जो नाक्यावर व रोजंदारी पद्धतीने काम करत असतो. या आत्महत्येची टक्केवारी मागील पाच वर्षात 6टक्क्यांनी वाढली आहे. 2019चे आकडे हे 2018 च्या तुलनेत 3.4 टक्क्यांनी वाढलेले आहेत. यात आत्महत्या करणाऱ्या मध्ये असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रमाण हे 139,123 आत्महत्या पैकी 32,563 म्हणजे 23.4 टक्के एवढे आहे,जे फार गंभीर आहे. याशिवाय घरगुती कामात गुंतलेल्या महिलांच्या आत्महत्येचा आकडा हा 21,359 म्हणजेच 15.4 टक्के एवढा आहे. स्वयंरोजगारांच्या नावाखाली छोट्या-मोठ्या कामात गुंतलेल्यांच्या आत्महत्येचा आकडा 16,098 म्हणजेच 11.8 टक्के एवढा आहे. बेरोजगारांमध्ये हा आकडा 14,019 म्हणजेच 10.1 टक्के एवढा आहे. व्यावसायिक व वेतनभोगी असलेल्यांमध्ये हा आकडा 12,725 म्हणजेच 9.01 टक्के आहे. विद्यार्थ्यांमध्ये 10,335 म्हणजेच 7.04 टक्के एवढा आहे. एनसीआरबीच्या आकड्या नुसार हे स्पष्ट होते की समाजातील असंघटित क्षेत्रातील कामगार आणि बेरोजगार युवकांमध्ये आत्महत्या करण्याचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत चालले आहे. त्यातच 2019 मध्ये 18 वर्ष वयापेक्षा कमी असलेल्या आकडा हा 9,613 एवढा आहे. 18 ते 30 वयातील तरुणांचा आकडा हा 48,774 आहे. यातून हे देखील स्पष्ट होते की, यात आत्महत्या करणाऱ्या मध्ये प्रत्येक तिसरा व्यक्ती हा तरुण वर्गातील आहे.

असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या आत्महत्या करण्याचा 2015 मधील आकडा पहिला तर 23,779 आहे. हा आकडा 2016 मध्ये 19 टक्क्यांनी वाढला म्हणजे या वर्षी 21,902 मजुरांनी आत्महत्या केल्या. यानंतर 2017 मध्ये 28,737 मजुरांनी आत्महत्या केल्या जी 22.01 टक्क्यांची वाढ होती. वर्ष 2018 मध्ये हा आकडा 30,124 पर्यंत गेला म्हणजेच 22.4 टक्क्यांची वाढ. हे सर्व आकडे प्रत्येक वर्षाला असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या अतिशय खराब होत चाललेल्या परिस्थितीचे वास्तव दर्शवतात. दुसरं हे की सर्वसाधारणतः कमी उत्पन्न असलेल्या व असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या आत्महत्या व बेरोजगार असलेल्यांच्या आत्महत्या ह्या वाढत चालल्या आहेत. 2019 मध्ये आत्महत्या करणाऱ्यांमध्ये 2/3 हे मजुरी करणारे असंघटित क्षेत्रातील कामगार होते ज्यांचे वार्षिक उत्पन्न हे 1 लाखापेक्षा कमी होते. सरकारी म्हणण्यानुसार राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत काम करणाऱ्या कामगाराचे वार्षिक उत्पन्न हे 1 लाख ते 5 लाख च्या दरम्यान असते (जर नियमित मिळाले तर, जे कधीच मिळत नाही). 1 लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असण्याचा अर्थ असा होतो की, प्रत्येक दिवसाला 278 रु किंवा त्यापेक्षा देखील कमी रोजंदारी असणे. कित्येक राज्यात मिळणाऱ्या मनरेगा मजुरी पेक्षा सुद्धा ही मजुरी कमी आहे. पोटही भरू शकत नाही इतक्या कमी मजुरीमध्ये जेव्हा आज कामगार वर्गाला जगावे लागत आहे, जेव्हा व्यवस्थेने जीवनच मरणप्राय करून ठेवले आहे, तेव्हा निर्माण होणारी असहायता समजणे अवघड नाही.

असंघटित क्षेत्रातील कामगार, प्रवासी मजूर, भूमिहीन शेतमजूर हे भारतीय श्रमशक्तीच्या 80 टक्के आहेत जे लॉकडाऊन मध्ये मागील सहा-सात महिन्यापासून दोन वेळेच्या जेवणाला सुद्धा मोताद झाले आहेत. अशातच गेल्या अनेक वर्षाचे एन.सी.आर.बी. अहवाल आणि त्यातले वाढते आकडे पाहिल्यावर असे दिसून येते की सरकार साठी प्रत्येक वर्षी अपराध आणि आत्महत्या संबंधी माहिती व आकडे प्रसारित करणे हे फ़क्त एक कारकुनी काम झाले आहे. आत्महत्या कमी करण्यासाठी संरचनात्मक निर्णय घेणे, कामगार कष्टकऱ्यांच्या जीवनाला सुरक्षित बनवणे यासाठी सरकारचे कोणतेही प्राधान्य नाही. जास्तीत जास्त काही दिवस अशा बातम्यांचे मीडिया इव्हेंट तयार केले जातात काही वर्तमान पत्रात 2-4 दिवस समीक्षा आणि तज्ञांची मते छापली जातात. त्यानंतर पुढच्या वर्षी याच प्रक्रियेची पुनरावृत्ती पाहायला मिळते.

आपल्या सर्वांनाच माहीत आहे की, आत्महत्या करणे हे कोणत्याच समस्येवर समाधान नाही. तरी सुद्धा तरुण आणि असंघटित क्षेत्रातील कष्ट करणाऱ्या सर्ववयीन कामगारांच्या आत्महत्या हे फार क्रूर आणि भयावह सत्य आहे. उमेदीच्या काळात तरुणांनी आपला जीवन प्रवास संपवणे याला कारण आहे की ज्या समाजात आपण जगतो तो कोणत्याही प्रकारची समाजिक सुरक्षितता, एकता, बंधुभावाची भावना, आत्मियता निर्माण करतच नाही. नफ्यासाठी चालणारी अर्थव्यवस्था सतत गरिबी निर्माण करत जाते, गरिब-श्रीमंत दरी वाढवत जाते, बहुसंख्यांक कामगार वर्गासाठी जीवनाच्या अत्यंत मुलभूत गरजांची पूर्तता करणे सुद्धा अशक्य बनवते आणि एका हताशेकडे घेऊन जाते. आत्महत्या करणाऱ्यांना समाजात जगण्यापेक्षा आपले आयुष्य संपवून घेणे हा उपाय वाटतो हे याच व्यवस्थेच्या रोगाचे द्योतक आहे. भांडवली जुलमी व्यवस्था ज्यात नफा केंद्रस्थानी असतो आणि माणसाचे महत्व एक 'श्रमशक्ती', कामाचे एक साधन, यंत्रासारखे दुसरे यंत्र यापेक्षा काहीही ठेवले जात नाही. रसातळाला गेलेले जीवन जगण्यापेक्षा मृत्यूला कवटाळणे हा पर्याय ही व्यवस्था उभी करते. कामगारांच्या आत्महत्या या खरे तर व्यवस्थेने नियोजनबद्ध पद्धतीने घडवलेले खूनच आहेत. परंतु स्वत:चे जीवन संपवणे हा ना स्वत:च्या प्रश्नावर उपाय आहे ना त्याच्या खऱ्या रुपावर म्हणजे प्रश्नाच्या सामाजिक-आर्थिक रुपावर. जीवनाचे दुर्दम्य संघर्ष करत असतानाच आज संघटीत होऊन आपण आपले जीवन नाही, तर आपले जीवन नरक बनवणाऱ्या भांडवली व्यवस्थेला संपवण्यासाठी संघटीत झाले पाहिजे. जीवनापासून न पळता कामगार वर्गाने त्याला धैर्याने, संघर्षाने सामोरे जाऊन दुनिया बदलण्याच्या कामी लागले पाहिजे.

# राशन का मिळत नाही?

**पान 1 वरून**

योजनांमध्ये खर्च झालेला 29 लाख टन, आणि फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया(एफ.सी.आय.) कडून बाजारात विकण्यात आलेला (खुल्या बाजारात विक्रीची योजना, OMSS- Open Market Sale Scheme) 8 लाख टन हे सर्व पकडून वर्षभरात एफ.सी.आय. मधून 34.4 दशलक्ष टन तांदुळाचा खप झाला होता. गव्हाच्या बाबतीत 2018-19 मध्ये वर्षभरात सार्वजनिक वितरण झालेला 22 दशलक्ष टन, इतर कल्याणकारी योजनांमध्ये खर्च झालेला 12 लाख टन आणि एफ.सी.आय. कडून बाजारात विकण्यात आलेला (OMSS) 80 लाख टन हे सर्व पकडून वर्षभरात एफ.सी.आय. मधून 31.2 दशलक्ष टन गव्हाचा खप झाला होता. जर देशातील 137 कोटी लोकसंख्येची तांदूळ व गव्हाची गरज काढाल तर ह्यात 40% वाढ करावी लागेल.

**पण एवढे धान्य देशात पैदा होते का?**

नक्कीच! देशाचे सोडाच, फक्त केंद्र सरकार नियंत्रित करत असणाऱ्या एफ.सी.आय. कडे धान्याचा साठा किती होता हे बघा.

'द वायर' मधील एका रिपोर्ट नुसार सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून देशातील गोरगरिबांना पुढील 6 महिने धान्य मिळावे इतके धान्य देशाच्या अन्नधान्य गोदामात शिल्लक होते. देशाची लोकसंख्या 1 अब्ज 37 कोटी इतकी असून 1 अब्ज 10 कोटी नागरिकांना पुढील सहा महिन्यासाठी दरडोई दरमहा 10 किलो धान्य (अंत्योदय योजने पेक्षा दुप्पट) मिळू शकले असते, इतका धान्यसाठा शिल्लक होता. ह्यासाठी लागणारा धान्यसाठा 66 दशलक्ष टन एवढा येईल. पण मार्चअखेर देशाच्या अन्नधान्य गोदामात 77 दशलक्ष टन इतका अन्नधान्याचा साठा होता व येत्या वर्षभरात यामध्ये आणखी 70 दशलक्ष टनाची भर पडण्याचा अंदाज होता.

अन्नधान्याचा बिलकुल तुटवडा नाही हे तर रघुराम राजन, अमर्त्य सेन, अभिजीत बॅनर्जी सारखे भांडवली व्यवस्थेचे समर्थक उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञ सुद्धा सांगत होते. मार्च महिन्यात एफ.सी.आय. च्या गोदामांत 77 दशलक्ष टन अन्नधान्य साठा होता जो 21 दशलक्ष टन राखीव साठ्याच्या (बफर स्टॉक) 3 पट होता. एप्रिल 2020 मध्ये एफ.सी.आय. कडे 24.7 दशलक्ष टन गहू होता जो बफर स्टॉक (75 लाख टन) च्या तीन पट पेक्षा जास्त होता तर तांदुळाचा साठा 49.1 दशलक्ष टन होता जो बफर स्टॉक (13.6 दशलक्ष टन) च्या जवळपास 3.5 पट होता.

एवढा प्रचंड धान्य साठा असतांना जर राजकीय इच्छाशक्ती असती तर राशन कार्ड व इतर समस्यांचा विचार न करता 4.14कोटी (ह्याच काळात केंद्र सरकारचा सुप्रीम कोर्टात दिलेला आकडा) प्रवासी कामगारांना **राशन देणे** व गरज भासेल त्यांच्यासाठी सामुदायिक स्वयंपाकघर (कम्युनिटी किचन) चालवणे सहज शक्य झाले असते. अशी स्वयंपाकघरं खरं तर अनेक भांडवली सरकार सुद्धा चालवतात अशी उदाहरणे आहेत (ती सुद्धा फार वाईट चालवल्या जातात हा मुद्दा सध्या सोडून दिला तरी) जसे की केरळ राज्यातील प्रवासी कामगारांसाठीचे भोजनालय, तामिळनाडू मधील अम्मा कॅन्टीन, कर्नाटकातील इंदिरा कॅन्टीन, ओडिशा, छत्तीसगढ, झारखंड मधील डाळ-भात केंद्र. एवढा मोठा साठा तर फक्त सरकारी गोदामांत होता त्यामुळे जर कवी धुमील प्रमाणे आपण प्रश्न केला की 'भूख कौन उपजाता हैं' तर उत्तर स्पष्ट आहे की कष्टकरी-कामगार वर्गाची उपासमार कोरोना मुळे नसून फॅसिस्ट मोदी सरकार व इतर सर्व भांडवली राज्य सरकारांमुळे झालेली आहे.

**रोम जळत होते आणि निरो बासरी वाजवत होता निरोचे साथीदार दिल्लीच्या दंगलीत गुंतले होते!**

एका बाजूला सरकार 'संकटाचे संधीत रुपांतर' करत अनेक जनतेसाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांना दिल्ली दंगलीच्या कारस्थानात गोवण्यात अतिशय सक्रिय होते. दुसऱ्या बाजूला लाखो कामगारांची उपासमार आणि पिडादायक परतीचा प्रवास चालू असतांना सरकार मात्र थंड कसायाच्या भूमिकेत स्थिती बघत होते. मार्च 2020 मधेच उपभोक्ता मामले, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने (Ministry of Consumer Affairs, Food & Public Distribution) लोकसभेत दिलेल्या आकडेवारी नुसार 2014-15 मध्ये 18,847.65 मेट्रिक टन, 2015-16 मध्ये 3,155.6 मेट्रिक टन, 2016-17 मध्ये 8,775.57 मेट्रिक टन, 2017-18 मध्ये 2,663.49 मेट्रिक टन आणि 2018-19 मध्ये 5,213.36 मेट्रिक टन **धान्य सडून वाया गेले.** म्हणजे एफ.सी.आय. च्या गोदामांत मागील पाच वर्षात 38,000 मेट्रिक टन पेक्षा जास्त अन्न मागील पाच वर्षात सडून वाया गेले. तहलका च्या एका बातमी नुसार देशात दरवर्षी जवळपास 10 लाख कोटी रुपयाचे पीक उत्पन्न निघाल्यावर खराब होत आहे. **थोडक्यात सरकारच्या मते, धान्य सडले तरी बेहत्तर पण जनतेला ते मिळता कामा नये!**

**सरकार, अजून किती कल्पक होणार? मोदी सरकार साठ्यातील अतिरिक्त धान्याचे काय करू इच्छीत होते?**

याच काळात देशाच्या अन्नधान्य गोदाम महामंडळातील अतिरिक्त असलेल्या लाखो टन तांदळाचे इथेलॉनमध्ये रुपांतर करून त्यातून हँड सॅनिटायझर तयार करण्याचा निर्णय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने घेतला. या संदर्भात नॅशनल बायोफ्युएल कोऑर्डिनेशन कमिटीची बैठक झाली. या बैठकीत २०१८च्या बायोफ्युएल संदर्भातील राष्ट्रीय धोरणाचा आधार घेत अतिरिक्त धान्यापासून इथेनॉल तयार करण्याला मंजुरी सुद्धा देण्यात आली. इथेनॉल निर्मितीचे इतर मार्ग उपलब्ध असताना, जनतेला उपाशी मारत सरकार मात्र इथेनॉल बनवण्यासाठी धान्य वापरत होते!

**अन्नधान्याच्या बाबतीत सुजलाम सुफलाम भारतातील कुपोषणाची स्थिती**

भारत जगभरात निकृष्ट पोषण, अन्न असुरक्षितता, कुपोषण, अल्पपोषण, उपासमारी साठी कुख्यात होताच. भारतात मागील सत्तर वर्षातील लोकसंख्येच्या तुलनेत अन्नधान्य उत्पादन वाढीचा दर जास्त आहे. संपूर्ण भारतीय उपखंडाची अन्नधान्य गरज भागवता येईल एवढे उत्पादन एकट्या भारतात होत आहे. (भारतातील शेतीची उत्पादकता इतर अनेक विकसनशील आणि विकसित देशांपेक्षा खूप कमी असूनही). भारतात अन्नधान्य उत्पादनातील वाढीसोबत भूकही वाढते आहे! देशात जसे अन्नधान्य उत्पादन वाढले तशीच भूक वाढली व अन्नधान्य निर्यात सुद्धा. वर्ष 2006-07 अन्नधान्य उत्पादन 217.2 दशलक्ष टन होते, जे 2010-11 में मध्ये वाढून 241.5 दशलक्ष टन झाले. ह्याच काळात भारतातील व्यापारी वर्गाने नफ्यासाठी 2008-09 मध्ये 65,772 कोटी रुपयांचे धान्य निर्यात केले, जे 2010-11 में मध्ये वाढून 81,915 कोटी रूपयांचे झाले. जागतिक भूक निर्देशांक 2019 च्या यादीत भारत 117 देशांमध्ये 100व्या स्थानावर होता. आशिया व आफ्रिकेतल्या भारतापेक्षा अनेक गरीब देशांना सुद्धा मागे टाकत भारत भुकेच्या बाबतीत इतका मागे आहे! यालाच म्हणतात मोदी सरकारचे 'अबकी बार सबका विकास'!

जागतिक भूक अहवाल 2016 च्या आकड्यांनुसार 5 वर्षांखालील वयाच्या मानाने उंची असणाऱ्यांमध्ये भारताचा क्रमांक 132 पैकी 114 वा होता व 5 वर्षांखालील वयाच्या मानाने वजन कमी असणाऱ्यांमध्ये 130 पैकी 120 वा क्रमांक होता. रक्ताक्षय (एनिमिया) च्या व्याप्ती मध्ये 185 देशांपैकी भारताचा 170 वा क्रमांक लागतो. देशात जवळपास 50 टक्के महिला (गरोदर महिला जोडून) व 60टक्के मुलं रक्ताक्षयाने ग्रसित आहेत.

'जनसत्तेच्या' एका बातमी नुसार भारताच्या एकंदर लोकसंख्येच्या 14.5% भाग म्हणजे जवळपास 19कोटी लोक कुपोषित आहेत. देशातील 5 वर्षाखालील मुलांमधे 21% मुलांचे उंचीच्या मानाने वजन कमी आहे, हे काही काळा साठी झालेल्या उपासमारीमुळे होते. जर सातत्याने अपुरा व सकस आहार मिळाला नाही तर वयाच्या माने मुलं खुरटी राहतात. भारतात 38% मुलांची वयाच्या मानाने उंची कमी आहे. आता आयुष्यभरात त्यांची घुंटलेली वाढ भरून काढता येणार नाही. हे तर कर्बोदके आणि प्रथिनांच्या कमी मुळे दिसणारे कुपोषण आहे जर सूक्ष्म घटकांशी संबंधित कुपोषणाचे प्रमाण मोजले तर ह्यापेक्षाही कितीतरी जास्त येईल. कारण दोन वेळेला फक्त पोट भरणारे (कॅलरीत मोजलेले) अन्न घेणारी अनके मुलं आहेत. लहान मुलांमधील कुपोषणाच्या निवारणासाठी सरकारने 1975 ला आय.सी.डी.एस. आणि 1995 मध्ये माध्यान्ह भोजन (मिड-डे मील) योजना सुरु केली. ह्यातही खर्च कमी करण्यासाठी पूर्ण पोषण शास्त्राला फाट्यावर मारत फक्त पोटभरणाऱ्या कॅलरीचाच पूर्वग्रह होता.

आऊटलूक च्या एका बातमी नुसार भारतात 2019-20 मध्ये विक्रमी 291.95 दशलक्ष टन अन्नधान्याचे उत्पादन झाले. उत्पादन एवढे जास्त होत असताना युनिसेफ च्या 'स्टेट ऑफ वर्ल्ड्स चिल्ड्रेन रिपोर्ट' नुसार भारतातील 5 वर्षाच्या आतील बालकांच्या मृत्यू मध्ये अजूनही 69% मृत्यूचे मूळ कुपोषणात आहे. जागतिक बँकेच्या मानव संसाधन सूची 2018 मध्ये भारताचा मूलांक 0.44 होता(सुचकांक 1 म्हणजे पूर्ण विकास, 0 म्हणजे कोणत्याच क्षमतेचा विकास होणार नाही).याचा अर्थ असा की आजचे भारतीय मुल प्रौढ झाल्यावर फक्त आपल्या क्षमतेच्या फक्त 44% क्षमता संपन्न बनेल, त्याच्या 66% क्षमता कु/अल्प पोषणामुळे कायमसाठी गमावून बसेल. मुबलक अन्नधान्य असतांना सत्ताधारी वर्ग भारताच्या नव्या पिढीला पंगू बनवत आहे कारण वैज्ञानिक व अनेक शोध असे दर्शवतात की मानवी मेंदूचा 90% विकास आयुष्याच्या पहिल्या 1000 दिवसात होतो, ह्यात गर्भातील 9 महिने व जन्मानंतरचे पहिली 2वर्ष मोडतात. हा काळ सर्वात नाजूक व महत्वाचा असतो. व ह्याकाळातील विकासात सर्वात मोठा वाटा योग्य सकस आहाराचा असतो. ह्या काळातील पोषण मुलांचा समोरच्या बौद्धिक-शारीरिक विकासाचा पाया म्हणून काम करते.

एकंदर अन्न सुरक्षेच्या नावावर जी सार्वजनिक वितरण व्यवस्था उभी आहे ती कथित 80 कोटी लाभार्त्यांना पोषण आहार पुरवत नसून फक्त कोऱ्या कॅलरीच्या सेवना कडे ढकलत आहे (गहू, तांदूळ, साखर, इत्यादी पुरवणे). तृणधान्यात मुखतः कर्बोदके असतात व फक्त 7-8% च्या जवळपास प्रथिने असतात. मांस आणि डाळींमध्ये 20% प्रथिने असतात. वेगवेगळ्या डाळी सार्वजनिक वितरणात जवळपास कुठेच मिळत नाहीत. पी.आर.एस. संस्थेच्या एका अहवालानुसार शहरी किंवा ग्रामीण भागातील भारतीय व्यक्तीच्या जेवणातील सरासरी 50% प्रथिने तृणधान्यातुन येतात व अन्नातील फक्त 15% प्रथिनं डाळ व मांसामधून येतात. आऊटलूक च्या एका बातमी नुसार भारतातील 6-23 महिन्या मधील 55% मुलांचे भाजीपाला व फळाचे सेवन जवळपास शून्य आहे. ह्यामुळे मुलांमध्ये अनेक जीवनसत्वे(व्हिटॅमिन) आणि क्षारांची(मिनरल्स) कमतरता निर्माण होते. ह्या सरासरी आकड्यांपेक्षा निश्चितीच कामगार-कष्टकरी वर्गाची स्थिती अतिशय दारुण आहे हे कोणीच नाकारू शकत नाही. भांडवलदार वर्गाला व त्यांच्या मॅनेजिंग कमिटीचे काम करणाऱ्या सरकारांना तर नफ्याची यंत्रणा अव्याहत चालू राहण्यासाठी ह्या कामगारांची फक्त श्रमशक्ती हवी असते. सार्वजनिक वितरणाचे 'लाभार्थी' मुख्यतः देशातील कामगार-कष्टकरी आहेत त्यामुळे कामगारांच्या फक्त मांस पेशींनी काम दिले तरी चालेल (ज्या फक्त कॅलरी वर झीजत-झीजत जातात पण काम देऊ शकतात) कारण बेरोजगारांची गर्दी खूप आहे! अशाप्रकारे शोषण केल्यावर मग रस काढलेले ऊसाचे पाचट सडण्यासाठी फेकून दिल्या जातं तसं कामगारांना रस्त्यावर फेकून दिले जातं.

मालक वर्गाची इच्छा नसतेच की मालक वर्गाच्या सरकारने कामगारांच्या कल्याणासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था (राशन व्यवय्स्था) चालवावी. एक तर संघटित कामगार वर्गाच्या दबावाखाली झुकून (जो आज अत्यंत कमजोर आहे) ते केले जाते किंवा मजुरी कमी द्यावी लागावी आणि नफ्याचा दर वाढावा म्हणून हे केले जाते. पण दुसऱ्या बाजूला सार्वजनिक वितरण, रोजगार हमी अशा धोरणांनी कामगार वर्गाची मोलभाव करण्याची शक्ती वाढेल ह्याचीही भीती त्याच्या मनात असते म्हणून कामगारांमध्ये उद्याची चूल पेटेल कीं नाही ह्याची भ्रांत टिकवणे ही नफ्याच्या यंत्रणेची गरज बनते. बेरोजगारी जास्त असेल आणि कामगार संघटित नसेल तेव्हा तर कामगार मालक वर्गाच्या पूर्णतः कोंडीत सापडलेला असतो. भांडवली व्यवस्थेला कामगारांने माणूस म्हणून सक्रिय, स्वस्थ, निरोगी राहणे, त्याचा शरीराचा संपूर्ण विकास होण्याची गरज नाही. संतुलित पोषक आहारात- कर्बोदके, प्रथिनं, व्हिटॅमिन, मिनरल्स, तंतूमय पदार्थ हवी असतात कडधान्या सोबत मुख्यतः डाळी, पालेभाज्या व फळभाज्या, मांस-मासे-अंडी, दुध, फळ ह्यातून मिळतात पण मुखतः कर्बोदकांच्या सेवनामुळे अतिवजन आणि स्थूल होण्याचे प्रमाण वाढत आहे. सकस आहारासाठी लागणाऱ्या जेवणातील पदार्थ विविधते मध्ये भारताची स्थिती किती विदारक आहे हे आपण जागतिक भूक अहवाल 2018 च्या ह्या आकड्यावरून बघू शकतो, भारतात फक्त 28% भारतीय मुलांना 5 पेक्षा जास्त पदार्थ खायला मिळत आहेत. बऱ्याच कामगारांची कुपोषित असूनही (!) खपाटीला न लागता चांगली ढेर पुढे आलेली दिसते ती ह्यामुळेच. परिस्थितीचा प्रचंड ताणतणाव, सततची असुरक्षितता व निकृष्ट पोषणाचा परिणाम म्हणून कामगारांमध्ये उच्चरक्तदाब आणि मधुमेह आणि इतर असंसर्गजन्य आजार होण्याचे प्रमाण वाढते आहे.

टेक्नोसर्व संस्थेच्या अंदाजानुसार लॉकडाऊन च्या काळात भाजीपाला व फळे ह्यांच्या सेवनात अजून 30% कमी होणार आहे, जे होतांना आपण बघितले आहे. कामगारांना ताबूत बांधलेल्या घोड्याच्या मुसक्या बांधून त्यात पडेल ते, मिळेल ते खावं लागतं तसंच तांदूळ-गहू-ज्वारी ह्यावर दिवस काढावे लागलेले आहेत अनेकांना तर तेही मिळाले नाहीत. ह्या सर्व

**पान 10 वर**

# राशन का मिळत नाही?

पान 9 वरून

स्थितीमुळे येत्या काळात लहान मुलांमध्ये तीव्र कुपोषण (severe acute malnutrition) अजून जास्त वाढणार आहे.

**मुख्यतः कॅलरीच देणारी कडधान्य तरी नीट किती लोकांपर्यंत पोहोचत आहेत का?**

2011 च्या आकडेवारी नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेतुन धान्य गळतीचे प्रमाण 46.7% एवढे अतिप्रचंड होते (वितरण व्यवस्थेतील गळती म्हणजे सरकार देऊ करत असलेल्यांपर्यंत धान्य न पोहोचणे)!! (संदर्भ: Third Report of the Standing Committee on Food, Consumer Affairs and Public Distribution: Demands for Grants 2015-16, Department of Food and Public Distribution)

सरकारी गोदामांत सोडणारे अन्न सोडून वाहतूक व साठवणूकी दरम्यान उचलेगिरी व नासाडी, स्वस्त धान्य दुकानातून बाजारात वळवलेले धान्य किंवा मोठ्या प्रमाणात लोकांना योजनेच्या बाहेर ठेवून ही धान्य गळती होते. केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा योजनेतुन वगळण्याचे किंवा विवर्जनाचे प्रमाण जे 2004-05 मध्ये 55% होते ते 2011-12 मध्येही 41% इतके प्रचंड झाले होते. आजही स्थिती वेगळी आहे असे मानण्याचे कारण नाही. जनतेला योजनांमधून वगळण्याची काम सरकारं अतिशय कार्यदक्षतेने करतात. उदाहरणार्थ, राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यानुसार राज्य सरकारांकडे लाभार्थी ओळखणे, रेशन कार्ड देण्याची जबाबदारी असते; पण 2016 च्या सरकारी महालेखापरिक्षकाच्या अहवालानुसार राज्य सरकारांनी ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही आणि जवळपास 49% लाभार्थी अजून ओळखण्यातच आलेले नाहीत.

अन्न सुरक्षा केवळ आर्थिक गरिबीशीच संबंधित नाही तर निवाऱ्याचा प्रश्न, सेवांची पोहोच ह्यासर्वांवर अवलंबून असते. त्यामुळे प्रवासी कामगार, बेघर कामगार, तथाकथित 'बेकायदेशीर' रित्या आभाळालाच छत करणाऱ्या कोट्यवधी कामगारांची उपासमारीची स्थिती नित्याची आहे. म्हणूनच तर प्रवासी कामगार-कष्टकरी वर्गाची स्थिती विस्फोटक होत असल्याचा शोध लागल्यावर सरकारला `आत्मनिर्भर भारत' योजना आणावी लागली ज्यात केंद्र सरकारने वेगवेगळ्या भागात अडकलेल्या व अन्न सुरक्षा कायद्यात समाविष्ट नसणाऱ्या व राशन कार्ड नसणाऱ्या जवळपास 8 कोटी प्रवासी जनतेला मोफत 8 लाख टन धान्य देण्याचा निर्णय घेतला. (म्हणजे सरकारने निर्लज्जपणे मान्य केले की एवढ्या मोठ्या संख्येने सर्वात जास्त असुरक्षित लोक अस्तित्वात आहेत). मोदी सरकारने जाहीर केलेलं 1.70 लाख कोटी रकमेचे पॅकेज सुद्धा नेहमी प्रमाणे -`माल कमी हवा जास्त' वाल्या पॅकिंगचे होते. देशातील 635 पुरोगामी लेखक, बौद्धिक, वकील, डॉक्टरांनी प्रधानमंत्र्यांना लिहिलेल्या एका पत्रात किमान अत्यावश्यक सेवा-सुविधा पुरवण्यासाठी अंदाजित खर्च 3.5 लाख कोटी रुपये होता. म्हणजे सरकारी पॅकेज किमान गरजेच्या निम्म्यापेक्षा कमी होते!

सरकार 80 कोटी व्यक्तींना धान्य देण्याचे अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत मान्य करते. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्या नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे 75% ग्रामीण लोकसंख्या आणि 50% शहरी लोकसंख्या, म्हणजे एकूण लोकसंख्येच्या 67% एवढ्या लोकांना अन्न पुरवणे अपेक्षित होते. (लाभार्थ्यांच्या संख्येत राज्य निहाय बदल होऊ शकतो जसे की राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार झारखंडमध्ये लोकसंख्येच्या 90% लाभार्थी आहेत). जीन ड्रेझ, खेरा आणि मुणगीकर ह्यां संशोधकांनी केलेल्या एका संशोधना नुसार 2011 ची जनगणना व इतर माहितीच्या आधारे, जसे की एकात्मिक ग्रामीण विकास योजनेच्या 1997 च्या यादीतील माहितीला आधार बनवत रेशन कार्ड देण्यात आले परंतु वेळेनुसार लोकसंख्येच्या अंदाजित वाढीच्या आकड्यानुसार लाभार्थी यादी अद्ययावत करण्यात आली नाही, नवीन राशन कार्ड वाटप करण्याचे आदेश केंद्र सरकारांनी दिले नाहीत व राज्यानीही ते मिळवले नाहीत. उदाहरणा दाखल अत्यंत अन्न असुरक्षित अशा झारखंड राज्यात राशन कार्ड साठी 7 लाख अर्ज अनेक वर्षांपासून पडून आहेत. म्हणजे सरकारांनी नवीन राशन कार्ड वाटप जवळपास बंदच केलेले आहेत. सबंध भारताच्या पातळीवर जर अन्न सुरक्षा कायद्याच्या 67% लाभार्थ्यांचा निकष लावला तर 2020 मधल्या अंदाजित 137.2 कोटी लोकसंख्येत 92.2 कोटी लाभार्थी हवे होते जे सरकारच्या आकड्यानुसार 80 कोटी आहेत (80 कोटी लोकांना धान्य मिळण्यात होणारी गळती तर अजून वेगळीच आहे). 2011 नंतर सरकाने नवीन राशन कार्ड जवळपास दिलेलेच नाही. ह्याचं एक महत्वाचं कारण सरकारला सार्वजनिक वितरणावरचा खर्च कमी करायचा आहे. 'राष्ट्रवादी' मोदी सरकारने सत्तेत आल्यावर ज्या पद्धतीने सर्वात आधी कामगार कायद्यांवर व हक्कांवर हल्ला केला तसाच त्यांनी सत्तेत आल्यावर लगेच ऑगस्ट 2014 मध्ये शांता कुमार कमिटी नेमली जिचे लक्ष ('भांडवलदारांच्या फायद्याकरिता' असे वाचल्यावरच त्याचा नीट अर्थ लागेल) 'कार्यक्षमता आणि वित्तीय व्यवस्थापन नीट करण्यासाठी' धोरण ठरवणे हे होते. कमिटीने आपला रिपोर्ट जानेवारी 2015 ला सोपवला. ज्यात एफ.सी.आय. चा साठा ठेवण्याचे कामाचे खाजगीकरण, अन्न सुरक्षा कायद्यामधील लाभार्थ्यांच्या संख्येला एकूण लोकसंख्येच्या 67% वरून फक्त 40% आणण्याचे सांगण्यात आले. तसेच सरकारने धान्य वितरण सोडून रोख हस्तांतरणाकडे (DBT) कडे जावे असेही सांगितले गेले. त्यानुसारच केंद्र सरकारने एफ.सी.आय. आणि राज्य सरकारं हस्तगत करत असणाऱ्या अन्न धान्य वरील आधीच कमी असणारी केंद्रीय बजेट मधील तरतूद एकदम कमी केलेली आहे. 2019-20मधील बजेट मधील अंदाज 1 लाख 51हजार कोटी होता पण वास्तवातील 'सुधारित' अंदाजानुसार फक्त 75 हजार कोटी देण्यात आले. आता तर 2020-21 मध्ये एफ.सी.आय. साठी बजेट अंदाजच फक्त 78 हजार कोटी आहे.

**रोख हस्तांतरण व लाभार्थी कमी करण्यामागे 'राष्ट्रवादी' सरकारचा उद्देश लगेच कोणालाही समजू शकेल.**

एफ.सी.आय. म्हणजे भारतीय खाद्य निगम या कंपनीचे काम देशातील अन्नाचा साठा राखणे, भाव नियंत्रण, राशन करिता अन्नाचे वितरण, बाजारभाव नियंत्रित करणे हे आहे. रोख हस्तांतर किंवा कुपन सिस्टिम सुरू करण्यामुळे एफ.सी.आय. चे व्यावहारिक दृष्ट्या खाजगीकरण होऊन जाईल. एफ.सी.आय. अप्रस्तुत होईल व देशातील अन्नधान्य पूर्णतः बाजाराच्या ताब्यात जाईल. अन्नधान्याच्या किमती एफ.सी.आय. मुळे नियंत्रित ठेवणे शक्य होते. आता रोख दिल्यामुळे बाजाराचा फायदा होईल पण सामान्य कष्टकरी-कामगार महागाने होरपळला जाईल. एफ.सी.आय. आतापर्यंत खुल्या बाजारात विक्री योजना वापरून बाजारात पुरवठा वाढून किमती नियंत्रित करू शकत असे, पण जनतेच्या खात्यात रोखीने पैसे जमा करण्याच्या योजनेमुळे ते मोडीत निघेल.

**भारताने सार्वजनिक वितरणातील (राशन व्यवस्था) लाभार्थी कमी करून, सार्वत्रिक वितरण व्यवस्था मोडीत काढून व लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था लागू करून काय कमावले आहे?**

भारतातील राशन म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्था दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सुरू करण्यात आली. युद्धाच्या काळात पडलेला दुष्काळामुळे आधीच त्रस्त व स्वातंत्र्याच्या भावनेने पेटलेल्या जनतेच्या असंतोषाचा भडका होऊ नये म्हणून ती सुरू झाली. 1960च्या काळातील दुष्काळाच्या काळात तिची व्याप्ती वाढली व भारतात कृषी गुंतवणूक व मूल्य आयोगाची व एफ.सी.आय. ची स्थापना झाली. नंतरच्या काळात 1970 पर्यंत ही व्यवस्था सार्वत्रिक (universal) बनली. ही व्यवस्था 1992 पर्यंत कुठलेही विवक्षित लक्षनिर्धारण न करता सर्वांसाठी चालत होती. 1992 नंतर जागतिक बँक व जागतिक नाणेनिधीच्या व भारतातील एका भांडवली गटाच्या दबावात कॉंग्रेसच्या म्हणजे मनमोहनसिंगाच्या नेतृत्वात तिची सार्वत्रिकता संपवून लक्षनिर्धारित राशन (Targated PDS) सुरू झाले. तेव्हा पासून ह्या गरिबांच्या योजनेला जास्तीत जास्त गरीब ठेवणे सुरू झाले.

वंदना शिवा ह्यांच्या अलजजीरा मधील एका लेखा नुसार 1991 पर्यंत अस्तित्वात असणारी सार्वत्रिक सार्वजनिक वितरण प्रणाली जी सर्वांना धान्य पुरवायची तिचा खर्च लक्षनिर्धारीत राशन व्यवस्थेपेक्षा कमी होता! सार्वत्रिक अन्न वितरणासाठी 4.5 अब्ज डॉलर खर्च होता तोच सबसिडी कमी करण्याच्या नावावावर लाभार्थी कमी करून चालू झालेल्या लक्षनिर्धारित राशनचा खर्च कमी न होता आश्चर्यकारक रित्या 12 अब्ज डॉलर झाला. कमी लोकांना धान्य पुरवण्याच्या वाढलेल्या किमतीमागे दोन कारणं होती. एक तर लक्षनिर्धारणासाठी प्रशासनिक खर्च खूप वाढला, लाभार्थींचा शोध घेणे, कार्ड काढणे, नियमन करणे याचा खर्च, तसेच राजकीय हस्तक्षेप व भ्रष्टाचार वाढला. दुसरं कारण जे ह्यापेक्षाही महत्वाचे आहे ते हे की बाजार व राशन च्या किंमतीमध्ये तफावत खूप वाढली. सार्वत्रिक राशन व्यवस्थेची किंमत नियंत्रणाची शक्ती कमी झाली व किंमत नियंत्रणाचे काम करत असणाऱ्या जीवनावश्यक वस्तू कायद्याचा (Essential Commodities Act) शक्तिपात करण्यात आला, त्यामुळे बाजार व राशन च्या किमतीमधील तफावत खूप वाढली. एफ.सी.आय. चा खरेदी खर्च वाढला. त्यामुळे हे लगेच लक्षात येण्यासारखे आहे की सबसिडी व वित्तीय तूट कमी करणे हा तर एक बहाणाच होता. खरा उद्देश जास्तीत जास्त अन्नधान्य बाजाराच्या हवाली करणे, नफेखोरीला खुली सूट देणे हाच होता. आज स्थिती ही आहे की वर्ल्ड बँक च्या एका अहवाला नुसार भारतीय कुटुंब उत्पन्नाच्या साधारणतः 40% फक्त अन्नावर खर्च करते आहे. सरकार अन्न सुरक्षेवर सारख्या अत्यंत मूलभूत गरजेतही खर्च कमी करत चालले आहे. 2017मध्ये सरकारने योजनांवर अन्न सुरक्षेवर केलेला खर्च देशाच्या जीडीपी च्या 1% पेक्षाही कमी होता. ह्यात कळस म्हणजे हा आहे की अन्न सुरक्षा कायद्या नुसार तर सरकार नैसर्गिक आपत्तीच्या काळात, जेव्हा सार्वत्रिक धान्य वितरणाशिवाय लोकांची गुजराण होऊच शकत नाही, तेव्हाही कायद्यानुसार `मोठी अनपेक्षित घटना'( 'फोर्स मॉज्यूरे') म्हणून तुम्हाला अन्न धान्य नाकारू शकते! म्हणजे आपत्तीमध्येही अन्न तुमचा कायदेशीर हक्क होऊ शकत नाही!

त्याचप्रमाणे फेब्रुवारी 2017 पासूनच मंत्रालयाने अन्न सुरक्षा कायद्याच्या लाभार्थ्यांना धान्य मिळवायचे असेल तर रेशन कार्ड ला आधार सोबत जोडण्याची सक्ती केली. आधारकार्ड बद्दल आता पर्यंत सरकारने जे ढोल बडवले त्याचे वास्तव हे आहे की आधारशी जोडलेल्या बायोमेट्रीक मुळे भ्रष्टाचार कमी झालाच नाही उलट अनेकांची गैरसोय होऊन अनेकांना योजनेच्या बाहेर ढकलून परिस्थिती अजून भीषण झली आहे.

अशाप्रकारे योजनाबद्ध पद्धतीने राशन व्यवस्था मोडीस काढण्याचे, आधार पासून विविध कागदपत्रांचे अडथळे उभे करून लोकांना राशन पासून वंचित करण्याचे, पोषणाला उद्दिष्ट न ठेवता फक्त कसेबसे पोट भरण्याचे उद्दिष्ट ठेवण्याचे व त्याद्वारे गरिबांना कुपोषित ठेवण्याचे अन्न धान्य अतिप्रचंड संख्येने उपलब्ध असतानाही ते सडू देण्याचे पण जनतेला मात्र उपाशी ठेवण्याचे, अन्नधान्य कंपन्या आणि व्यापारी यांच्या नफ्यासाठी जनतेला उपाशी ठेवण्याचे, एक साधी कमी खर्चिक प्रभावी अशी राशन व्यवस्था न राबवता उलट महागडी, जटील आणि जनविरोधी व्यवस्था राबवण्याचे, 'अन्न सुरक्षा' सारखे फसव्या नावांचे कायदे करण्याचे काम भारतातील भांडवलदारांच्या अधिकारातील कॉंग्रेस-भाजपसारख्या भांडवली पक्षांची सरकारे गेली 70 वर्षे करत आहेत.

हजारो वर्षांमध्ये मानवी समाजाने प्रचंड मोठी प्रगती केली आहे. पण उत्क्रांती व मानवी श्रमाने इथं पर्यंत आलेल्या आधुनिक माणसाला ही भांडवली व्यवस्था एका बाजूला कोरोना सारखे आजार देत आहे आणि निव्वळ जगण्याच्या पशूवत प्रेरणेपर्यंत सुद्धा पोहोचवत आहे. भूक ही प्रत्येक प्राण्याची सर्वात मूलभूत प्रेरणा आहे. पण माणूस सर्वसामान्य प्राणी नाही, तो निसर्गतः मिळणाऱ्या गोष्टींच्या मर्यादा हेतुपुरस्कार श्रमाने ओलांडतो. कष्ट करतो व मानवीय अस्तित्व निर्माण करतो. पण अश्या संकटाच्या काळात भांडवली व्यवस्थेने देशातील 90 कोटी सर्वहारा-अर्धसर्वहारा जनतेला फक्त अन्नाच्या भ्रांतीत जगत राहण्या एवढे असहाय्य केले आहे.

## उदारमतवादी लोकांबद्दल लेनिन

"उदारमतवादी लोक संघर्षाचे नेतृत्व करूच शकत नाहीत कारण ते संघर्षाला घाबरतात. प्रतिक्रिया तीव्र झाली की ते संविधानाचे रडणे गाऊ लागतात आणि अशाप्रकारे आपल्या संधिसाधूपणाने ते लोकांची डोकी बिघडवण्याची कामं करतात.

... एखाद्या उदारमतवाद्याला शिवी दिली जावी तर तो म्हणतो कि नशीब त्याला मारहाण नाही झाली, मारहाण झाली तर तो देवाचे आभार मानतो कि त्याचा जीव नाही घेतला आणि जीव गेला तर तो ईश्वराला धन्यवाद देतो कि त्याचा अनश्वर आत्मा त्याच्या नश्वर देहापासून मुक्त झाला."

# टी.आर.पी. घोटाळा: डाळीत काळंबेरं नाही, डाळच काळी आहे! भांडवली प्रसारमाध्यमं हाच एक मोठा घोटाळा आहे!!

✍ जय

नुकताच रिपब्लिक टीव्हीने चालवलेला टी.आर.पी. (टेलिव्हिजन रेटींग पॉइंट, एखादा टीव्ही चॅनल किती बघितला जातो याची आकडेवारी) घोटाळा उघडकीस आला आहे. आपल्या चॅनेलला जास्त दर्शक पाहतात याची खोटी आकडेवारी उभी करण्यासाठी या चॅनेलने दर्शकसंख्या मोजणाऱ्या संस्थेला आणि ज्या दर्शकांच्या आधारावर टी.आर.पी. ठरवला जातो त्या दर्शकांनाही पैसे चारले. या आकडेवारीच्या आधारावरच चॅनेलवर चालणाऱ्या जाहिरातींचे दर ठरतात, त्यातूनच ठरते चॅनेलचे उत्पन्न आणि चॅनेल मालकांचा नफा. या घोटाळ्याच्या आरोपानंतर मीडीयामध्ये चाललेल्या भ्रष्टाचाराबद्दल फार बोलले जात आहे. परंतु कामगार-कष्टकरी वर्गाने हे समजणे आवश्यक आहे की आपल्या वर्गहिताच्या दृष्टीने हा घोटाळा हे फक्त हिमनगाचे टोक आहे, डाळीत काही काळंबेरं नाही तर अख्खी डाळंच काळी आहे. संपूर्ण टीव्ही प्रसारमाध्यमे आज भांडवलदार वर्गाच्या ताब्यात आहेत आणि कामगार वर्गाविरोधात व नफ्याच्या व्यवस्थेच्या बाजूने प्रचार करणे, आणि लोकांनी काय विचार करावा व काय विचार करू नये हे ठरवण्यासाठीच तो राबवला जातो. आपले स्वत:चे खरे राजकीय हित काय आहे हे आपल्याला समजू देऊ नये हेच मीडीयाचे उद्दिष्ट आहे.

सगळीकडे फक्त बोलले जाते की मीडिया हा लोकशाहीचा चौथा खांब आहे वगैरे. पण भारतातील आणि जगातील प्रसारमाध्यमांचा इतिहास हेच दाखवतो की त्याने कधीही जनतेच्या आणि कामगार वर्गाच्या खऱ्या हितांचे कधीही प्रतिनिधित्व केले नाही. आपण ऐकले असेल की आणीबाणीच्या काळात मीडीयावर बंधने आली होती, सेन्सरशीप लागू होती, हे खरे आहे, पण यापेक्षा मोठे वास्तव हे आहे की खुल्या किंवा छुप्या पद्धतीने नेहमीच कामगार वर्गाचा आवाज गायब करणे हेच मीडीयाचे काम राहिले आहे. भारतातील तथाकथित 'मुख्य धारेतील' प्रसारमाध्यमांच्या संदर्भात निवडक बातम्या देणे, खोट्या आणि विखारी बातम्या पसरवणे, भ्रष्टाचार, पैसे देऊन बातम्या, अभिव्यक्ती निर्बंध, पत्रकारांवर बंधने, इत्यादी गोष्टी सतत चर्चेत राहिल्या आहेत. अशाप्रकारच्या प्रकरणांमध्ये भाजपच नाही तर पूर्वी काँग्रेस आणि इतर भांडवली पक्ष आणि त्यांचे नेते सामील असण्याबद्दलही सतत बोलले गेले आहे. परंतु 2014 मध्ये मोदी सत्तेत आल्यानंतर प्रसारमाध्यमांमध्ये धर्मवादी राजकीय प्रचार, लोकांना जात-धर्माच्या नावाने विभागणारा प्रचार, लोकांमध्ये अंधराष्ट्रवादाचा प्रचार, खोट्या बातम्या देणे, हिंदुत्वाच्या विचारधारेला पूरक अशाच चर्चा घडवणे हे मोठ्या प्रमाणात आणि अगदी उघडपणे घडून येताना दिसत आहे. आज जेव्हा बेरोजगारी, महागाई, मजुरीमध्ये कपात, बँकांचे बुडणे, कामगार कायदे संपवले जाणे, महिलांविरोधातील गुन्हेगारी, आरोग्याचे संकट, विद्यार्थ्यांच्या फी वाढणे, ऑनलाईन शिक्षणाच्या अडचणी, लॉकडाऊनचे परिणाम, कोरोनाचे संकट असे कामगार वर्गाच्या जीवनाशी जोडलेले असंख्य मुद्दे ऐरणीवर असताना, मीडिया मात्र जात, धर्म, पाकिस्तान, फिल्मी हिरो याच मुद्यांवर जनतेला अडकवू पहात आहे. याचे कारण आहे की मीडियाचे उद्दिष्ट कामगार-कष्टकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे हे नाहीच; तर उलट आपले मालक असलेल्या भांडवलदार, संपत्तीधारक वर्गाच्या हितांचे रक्षण करणे हेच आहे- तोच वर्ग जो जाहिरातींद्वारे प्रसारमाध्यमांना आणि त्यांच्या गलेलठ्ठ पगार घेणाऱ्या 'स्टार' पत्रकारांना पोसतो.

आपण म्हणूनच टीआरपी घोटाळ्या सारख्या घटनांना स्वतंत्रपणे न बघता, नफ्यासाठी, धंद्यासाठी चालवल्या जाणाऱ्या प्रसारमाध्यम यंत्रणेचा भाग म्हणून, प्रसारमाध्यमे आणि भांडवली व्यवस्थेच्या मंत्रीमंडळ, राजकारण, निवडणुका, इत्यादी इतर भागांचे आपापसातील संबंधांचाच एक भाग म्हणून पाहिले पाहिजे. आज मुख्यधारेतील सर्व प्रसार माध्यमांचे जवळपास 75 टक्के म्हणजे मुख्य उत्पन्न जाहिरातींमधून येते. सेंटर फॉर मीडिया स्टडीजच्या अहवालानुसार, भाजपने 2019 लोकसभा निवडणुकांमध्ये जवळपास तब्बल 25,000 कोटी रुपये जाहिरातींवर खर्च केला होता, ज्यापैकी बहुतेक पैसा अंबानी, अदानी सारख्या भांडवलदारांनी पुरवला होता. माहिती अधिकाराखाली मिळालेल्या एका माहितीनुसार भाजपने 2014-18 या काळात 4,300 कोटी रुपये जाहिरातींवर खर्च केले आहेत. म्हणजे खरे तर सरकार सुद्धा प्रसारमाध्यमांचा मोठा ग्राहक वा निधीचा स्रोत आहे. आता ग्राहकाविरोधात कोण जाईल बरे? त्यामुळे सुद्धा आज प्रसारमाध्यमांचा एक मोठा हिस्सा सरकारच्या कोणत्याही कृतीला चिकित्सकपणे तपासण्याच्या सुद्धा फंद्यात पडत नाही. सरकारी मालकीची प्रसारमाध्यमे आता कालबाह्य झाली आहेत (सरकारी होती तेव्हा सुद्धा ती भांडवलदार वर्गाच्यास सरकारांची होती), आणि आज तर खाजगी कंपन्याच प्रसारमाध्यमे चालवतात, ज्या फक्त नफ्यासाठीच बातम्यांच्या बाजारात आहेत. अशा प्रसारमाध्यमांकडून कामगार वर्गाची बाजू मांडण्याची अपेक्षा करणेच व्यर्थ आहे.

काही महत्वाच्या राष्ट्रीय चॅनेल्सच्या मालकीकडे नजर टाकूयात. आजतक चॅनेल मध्ये अंबानी आणि रिलायन्स कंपनीची 15 टक्के भागीदारी आहे. अंबानी न्यूज18चे सुद्धा मालक आहेत, झी न्यूज चा मालक आहे सुभाष चंद्रा हा उद्योगपती जो भाजपचा खासदार सुद्धा आहे. रिपब्लीक भारत हा ए.आर.जी. आऊटलायर मीडीया कंपनीचा चॅनेल आहे ज्यामध्ये भाजपचे राज्यसभेतील खासदार राजीव चंद्रशेखर यांचा निधी गुंतलेला आहे. इंडिया न्युजचे मालक आहेत कार्तिकेय शर्मा ज्यांचा भाऊ मनू शर्माला जेसिका लाल खून प्रकरणात जन्मठेप झाली आहे. याच कार्तिकेय शर्मांकडे न्यूज-एक्स सहित काही चॅनेल चालवणाऱ्या आय.टी. व्ही. मीडिया ग्रुपची मालकी आहे. कार्तिकेय हे काँग्रेसचे नेते विनोद शर्मा यांचे पुत्र आहेत. अशी अनेक उदाहरणे देता येतील. अशाप्रकारे दिसून येते की मोठमोठी औद्योगिक घराणी, उद्योगपती, राजकारणी जे खरे तर उद्योगपतीच आहेत, अशांचेच पूर्ण नियंत्रण न्युज चॅनेल्सवर आहे. हे उद्योगपती जे कामगारवर्गाचे शोषण करूनच गब्बर झाले आहेत, ते कामगारवर्गाची बाजू न्यूज चॅनेलवर मांडू देतील? ज्यांच्यासाठी बातमी ही सुद्धा धंद्याची गोष्ट आहे, तो मीडिया कधीकधी नाही तर नेहमीच 'पेड' मीडीया आहे. आज पत्रकारांचे काम जनतेला सत्य सांगणे नसून बातमीच्या नावाने काहीही विकणे हे आहे. लोकांनी कशावर विश्वास ठेवावा, कशावर नाही, लोकांचे काय मत असावे, काय मत नसावे हे ठरवण्यासाठीचे एक हत्यार आहे भांडवली मीडीया. सतत ब्रेकिंग न्युज, 'मोठा खुलासा', दिखाव्याच्या चर्चा वगैरे हे फक्त बातम्या विकण्याचे स्टंट आहेत. यांनी तर आता सामान्य लोकांचे खटले चालवण्याचे कामही स्वत:कडे घेतले आहे आणि आपापल्या धन्यांच्या मर्जीनुसार कोणालाही बदनाम करणे, गुन्हेगार ठरवणे ही कामे मीडिया करत आहे. एखादा सिनेकलाकार मेला तर त्यावर आठवडाभर बातम्या चालतात, पण रोज कारखान्यांमध्ये कामगार मरतात त्यांची एकही बातमी हे बनवत नाहीत. रोज सफाई काम करताना नाल्यांमध्ये कामगार मरतात, रोज 5000 मुलं कुपोषणाने मरतात, लॉकडाऊनमुळे 14 कोटी नोकऱ्या गेल्या अशा अनेक बातम्यांबद्दल हे चॅनेल गप्प आहेत. याचे कारण जाहिरातदारांचा माल विकत घेऊ शकणाऱ्या वर्गाला जे विकले जाऊ शकते तेच दाखवायचे आहे, आणि विचारधारात्मक रित्या आपल्या मालकवर्गाचे हित सुद्धा जपायचे आहे. बातम्यांना मनोरंजनाचे साधन केले गेले आहे. तेव्हा टीआरपी सारखे घोटाळे हे फक्त भांडवलदार वर्गातील आपापसातील स्पर्धेचे लक्षण आहे, कामगार वर्गासाठी त्यामध्ये काहीही नाही.

भाजप सत्तेत आल्यानंतर मोठ्या प्रमाणात भाजपच्या आय.टी. सेल द्वारे खोट्या बातम्या पसरवणे, ट्रोल करणे हे प्रकार तर चालू झालेच, शिवाय जवळपास सर्वच टीव्ही चॅनेल भाजपचे भाट बनल्याचे दिसून येते. भाजपद्वारे भांडवलदारांनी पुरवलेला मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करून सोशल मीडीयावर हजारो पगारी कर्मचाऱ्यांद्वारे सुशांत सिंह प्रकरण असो, वा कोरोना काळातील काही धर्मविशिष्टांचे मीडीयाने रचलेले षडयंत्र, जनतेवर भडीमार करून तत्काळ मत बनवण्याचे काम केले जात आहे. मुख्य धारेतील प्रसारमाध्यमे सुद्धा याला साथ देताना दिसतो. याचे मुख्य कारण ह्या प्रसारमाध्यमांचे पत्रकार वा संपादक हे भाजपचे 'खरे' चहाते आहेत किंवा विशेष प्रेमी आहेत हे नाही तर प्रसारमाध्यमांची मालकी ज्या उद्योगपती वर्गाकडे आहे, जो उद्योगपतीवर्ग या माध्यमांद्वारे फक्त मालच विकत नाही तर जनतेने काय विचार करायचा हे ठरवतो त्याला आज आर्थिक संकट तीव्र झालेले असताना भाजप सारख्या फॅसिस्ट पक्षाच्या सत्तेची अत्यंत गरज आहे. प्रसारमाध्यमांवर रोज दिसणारे 'स्टार' पत्रकार हे अजून काही नाही तर आपापल्या उद्योगपती मालकांच्या आज्ञेचे पालनकर्ते आहेत आणि आज मालकांची मर्जी कामगारांवर कहर कोसळवणाऱ्या 'लोहपुरुष' मोदींवर आहे.

अनेकजण मीडियावर नियंत्रणाचे बोलतात. परंतु भांडवली व्यवस्थेत कोणत्याही प्रकारचे नियंत्रण या मीडियाला कामगार वर्गाच्या बाजूचा बनवू शकत नाहीत. उदाहरणार्थ न्यूज ब्रॉडकास्ट असोसिएशन सारख्या नियामक संस्था या सुद्धा न्युज चॅनेल्सनी मिळूनच बनवलेल्या आहेत आणि त्या स्वत:च या क्षेत्रातील अधिकारी आहेत. नियमनामुळे नफा कमावण्याचे उद्दिष्ट गायब होऊ शकत नाही, आणि नफ्यासोबत येणारी धंद्याची गणिती, अधूनमधून समोर येणारा पण नेहमीच चालणारा काळाबाजार, आणि व्यापक भांडवली विचारधारात्मक कार्य बदलू शकत नाही.

आज कामगार वर्गाने स्वत:च्या श्रमाच्या पै-पै गोळा केलेल्या पैशातून, आपापसातील समन्वयातून आणि स्वयंसेवी श्रमातून आपली स्वत:ची प्रसारमाध्यमे उभी करणे हाच योग्य पर्याय आहे. सोशल मीडियाला सुद्धा मोठ्या संख्येने आपल्या बाजूची मते मांडण्यासाठी आणि फॅसिस्टांचा खोटा भडकाऊ प्रचार खोडून काढण्यासाठी वापरणे आवश्यक आहे.

**अनुवाद: राहुल**

---

## कविता - चेटकिणी

✍ कविता कृष्णपल्लवी, अनुवाद: गणेश विसपुते

चेटकिणी खूप हसतात
निलाजऱ्या आणि जिद्दी असतात
अत्यंत बडबड्या असतात अन् प्रत्येक मुद्यावर
वाद घालत राहतात न थकता.
चेटकिणी आपल्या आयुष्याचा प्रत्येक निर्णय स्वतःच घेतात.
आणि म्हणूनच अतिशय भयावह असतात.
लोकांना खातरी असते की सगळ्या स्त्रियांना
त्या बिघडवू शकतात आणि या जगाचा नरक बनवू शकतात.
बुद्धिवाद्यांप्रमाणे
चेटकिणी तडजोडी करत नाहीत,
आणि कोणत्याही शांतीप्रिय सदगृहस्थांप्रमाणे
कोणतीही किंमत देऊन शांतता विकत घेण्याचा प्रयत्नही.
काळाप्रमाणे चालणं आणि स्वतःला तसं ढाळण्याचा
कोणताही प्रयत्न त्या करत नाहीत.
चेटकिणी प्रतिवाद करतात, प्रश्न विचारत राहतात,
मतभेद दाखवतात, पलटवार करतात.
चेटकिणी दिवसाउजेडी जगातल्या सगळ्या
स्त्रियांमध्ये मिसळून गेलेल्या असतात
पण सहसा त्यांच्या सवयींनं ओळखल्या जातातच.
कित्येकदा एखाद्या पुरुषाला अचानक लक्षात येतं
की त्याची पत्नी किंवा मुलगी एक चेटकिण बनलेली आहे.
मग दुनियेतले तमाम मांत्रिक अघोरी तांत्रिक त्यांना
अनेक प्रकारे बांधून, समजावून पाहतात आणि
हारून मग तऱ्हेतऱ्हेच्या शिक्षा देतात.
सहसा त्यांना दूर देशी निर्वासित केलं जातं
पण त्या नेहमी परत येतात आणि न थांबता
पुन्हा आपली कामं करू लागतात.
त्या उद्विग्न अन् अशांत आत्मे असतात
चराचराच्या कोपऱ्या-कोपऱ्यांत भटकणारे.
त्या असतात शापित यक्षकन्या
ज्यांनी क्षमायाचना करण्याचा वा देवलोकी जाण्यासाठीच्या
परवान्यासाठी अर्ज केल्याचा कुठलाही इतिहास सापडत नाही.
चेटकिणींच्या दुःखांच्या कहाण्या विरळच दिसतात
अमावस्येच्या रात्री स्मशानातल्या नीरव एकांतात
चेटकिणी कुठल्याशा ऐतिहासिक वेदनेनं
रडतात रक्ताची आसवं गाळत
आणि कवींसाठी मिथकीय रहस्यं
निर्माण करतात
चेटकिणी तिरस्कृत वटवाघळांशी बोलतात
आणि रात्रभर भणभणत
त्यांच्यासह आकाशात सूर मारत उडत राहतात
त्या छमछम पैंजणं वाजवत
त्यांच्या उलट्या पावलांसह नाचत
दाट ओलसर रानांतल्या खाचरांतल्या
तलावापर्यंत जातात न्हायला
आणि पुन्हा नजीकच्या पिंपळावर चढून
त्यांच्या सगळ्यात उंच फांदीवरून
तमाम स्त्रियांच्या उदास झोपेत आणि स्वप्नांमध्ये
दणदिशी उडी मारतात.

# देशाचे 'हिरोज्' अडकलेत कोरोनाच्या मृत्यूसापळ्यात!

## 350 हुन अधिक डॉक्टरांचा कोरोनामुळे मृत्यू!!

✍ पूजा

'कोविड ड्युटी' करत असतांना कोरोनाची लागण झाल्यामुळे मृत्यू पावलेल्या आरोग्यकर्मचाऱ्यांबद्दल केंद्र सरकारकडे कोणत्याही स्वरूपातली अधिकृत माहिती उपलब्ध नाही! देशाचे आरोग्य मंत्री असणाऱ्या डॉ.हर्षवर्धन यांचे हे विधान आणि मोदी सरकारच्या 'कोरोना वॉरियर्स' साठीच्या कृतज्ञतापूर्ततेसाठी चालवलेल्या थाळी-टाळी-मेणबत्ती-टॉर्च-पुष्पवर्षावाच्या खेळाने पुनःश्च मोदींच्या दांभिकतेचे दर्शन आपल्याला घडवून आणले आहे. जगभरात स्वतःचे कौतुक करवून घेत फिरणाऱ्या प्रधानमंत्र्याच्या देशाने कोरोनामुळे जितके डॉक्टर्स आणि आरोग्यकर्मचारी गमावले तितके जगभरात इतर कुठल्याही देशाने गमावले नाहीत. 16 सप्टेंबर रोजी इंडियन मेडिकल असोसिएशन ( IMA, आय.एम.ए.) ने जाहीर केलेल्या अहवालानुसार तब्बल 382 कोविड ड्युटी करणाऱ्या डॉक्टर्स चा मृत्यू झाला असून त्यात वय वर्ष 27 पासून ते 87 पर्यंतच्या वयोगटातील तमिळनाडू, महाराष्ट्र, गुजरात, बिहार, कर्नाटक, आंध्रप्रदेश व दिल्लीतील डॉक्टरांचा प्रामुख्याने समावेश आहे. देशभरात अनेक नामांकित डॉक्टरांचा तसेच आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा कोरोनामुळे मृत्यु होऊनदेखील त्याची दखल घेतली गेलेली नाही, आजतागायत त्यांच्या सुरक्षेसाठी देखील आवश्यक ती पाऊले उचलली गेलेली नाहीत.

बीबीसी या वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार देशभरातल्या विविध ठिकाणच्या हॉस्पिटल्स मध्ये पी.पी.ई. किट्स उपलब्ध नाहीत. मुंबईत सायन हॉस्पिटल मध्ये काम करणाऱ्या डॉ.यश सबरवाल यांनी बी.बी.सी. मराठी ला सांगितले की डॉक्टर्स हे रुग्णाचा पहिला संपर्क असून देखील आम्हाला एड्स (एच.आय.व्ही.) कीट्स वापरून रुग्णांवर उपचार करावे लागत आहेत. भारताकडे मुळात पुरेसे डॉक्टर्स नसतांना म्हणजे सरासरी 1,457 लोकांमागे एक डॉक्टर (झारखंड सारख्या मागासलेल्या राज्यांत तर 8,180 लोकांमागे एक डॉक्टर) अशी परिस्थिती असतांना देखील त्यांच्या सुरक्षेबाबत सरकारकडून मुळीच खबरदारी घेतली गेलेली नाही. डेक्कन क्रोनिकल मध्ये 7 जुलै ला प्रकाशित केलेल्या बातमी नुसार प्रचंड मोठा 'व्हायरल लोड' आणि रुग्णांसोबत येणाऱ्या सततच्या संपर्कामुळे आरोग्यकर्मचाऱ्यांमध्ये कोरोना मृत्यदर हा 6.1 टक्के इतका आहे! ह्या मृत्यूंमध्ये तरुण तसेच कुठल्याही प्रकारच्या आजाराची लागण नसलेले आरोग्यकर्मी देखील आहेत. ह्या बातमी अनुसार 25 नर्सेसचा कोरोनामुळे मृत्यु झाला असून 2 नर्सेस आणि 2 डॉक्टर्स यांचा मानसिक आणि शारीरिक थकव्यामुळे गाडी चालवताना अपघाती मृत्यु झाला. लोकांमध्ये असणाऱ्या आजाराप्रती असलेली सामाजिक डागाची भावना ('सोशल स्टिगमा') व त्यामुळे होणारी उपेक्षा आणि तणाव ह्या कारणाने 5 नर्सेस आणि एका डॉक्टरने आत्महत्या देखील केल्याचे धक्कादायक वृत्त समोर आले आहे. काही उदाहरणे अशी देखील आहेत ज्यात कोरोनाबधित डॉक्टरांसोबतच त्यांच्या जीवनसाथींचा देखील कोरोनाची लागण होऊन मृत्यू झाला आहे. 'द प्रिंट' च्या एक अहवालानुसार 14 जुलै पर्यंत देशाची राजधानी असलेल्या दिल्ली शहरात 2000 हुन अधिक आरोग्यकर्मचाऱ्यांना कोरोनाची बाधा झाली असून आरोग्यकर्मचाऱ्यांकडून पी.पी.ई. किट्सचा अभाव, विलगीकरणाच्या स्वास्थ्यपूर्ण सुविधा तसेच मानसिक आधार यांची वारंवार मागणी केली जात आहे.

8 मार्च रोजी भिलवाडा, राजस्थान येथील एका कोविड रुग्णाच्या संपर्कात आल्यामुळे 13 डॉक्टर्स व आरोग्यकर्मींना कोरोनाची लागण झाली व त्यातील तिघांचा मृत्यू झाला. 24 एप्रिल रोजी मुंबईतील गोवंडी भागात 2 हॉस्पिटल्स मध्ये काम करणाऱ्या एक 36 वर्षांच्या डॉक्टरचा कोरोना संक्रमण झाल्याने अनेक अवयव निकामी (मल्टिपल ऑर्गन फेल्यूअर) होऊन मृत्यू झाला. सुरवातीला जवळच्या कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये बेड्स नसल्यामुळे दूर असलेल्या सायन मध्ये भरती करण्यात आल्यानन्तर ऑक्सिजन बेड अभावी सोमैय्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु त्यांनतर डायलिसिस ची गरज भासल्यामुळे व सुविधा सोमैय्यामध्ये उपलब्ध नसल्यामुळे पुन्हा रहेजा हॉस्पिटल ला हलवण्यात आले. त्यावेळी देखील व्हेंटिलेटर ची सुविधा असलेली रुग्णवाहिनी उपलब्ध न झाल्यामुळे साध्या रुग्णवाहिनीतून रहेजा रुग्णालयात दाखल करण्यात आले परंतु त्यांनतर यकृत आणि किडनी निकामी झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. इंडिया टुडे ला दिलेल्या मुलाखतीत स्वतः डॉक्टर असलेल्या मृत डॉक्टरच्या भावाने वेळेत उपचार व इतर आरोग्य सुविधा न मिळाल्यामुळे भावाला गमावल्याचे दुःख व्यक्त केले. हिंदुस्थान टाइम्स च्या वृत्तानुसार 24 मे रोजी पुण्यातील घोरपडी भागात राहणाऱ्या डॉक्टरचा ससून रुग्णालयात उपचारादरम्यान कोरोनामुळे मृत्यू झाला. 17 जून रोजी कालवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात कार्यरत असणाऱ्या एक 49 वर्षीय डॉक्टरचा कोरोनाने मृत्यू झाला. त्याच महिन्यात 24 डॉक्टर्स एकट्या ठाणे जिल्ह्यात कोरोनाशी झुंज देत होते. 3 जून रोजी मुंबईतील सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक आणि नाक, कान, घसा तज्ज्ञ डॉ. चित्तरंजन भावे यांचा देखील मृत्यू झाला. एका कोरोनाबधित रुग्णावर शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांना कोरोनाची लागण झाली. लोकसत्ता ने दिलेल्या बातमीनुसार त्यांना रहेजा रुग्णालयात नेले असता 10 तास बेड साठी ताटकळत वाट बघावी लागली.

मोदी सरकारने कोरोनाला हरविण्यासाठी जनतेला केलेली टाळी-थाळी-दिवे सारखी सगळी आव्हानं भाजप-भक्त जनतेने अतिउत्साहाने पूर्ण केल्या नंतरही कोरोनाचा प्रसार काही थांबला नाही. सध्या कोरोना हा मोठ्या शहरांपासून छोट्या शहरंपर्यंत व खेड्यांपर्यंत पोहचला असून तिथूनही अनेक कोरोना लोकं कोरोनाचे बळी ठरत असून त्यात डॉक्टर्स देखील आहेत. टाइम्स ऑफ इंडिया च्या 30 ऑगस्ट च्या वृत्तानुसार विदर्भातील मुर्तिझापूर कोविड केअर केंद्रात 5 महिन्यांपासून कार्यरत असणाऱ्या डॉ. विवेक फडके, वय 55, यांचा कोरोनाची लागण झाल्यानंतर अवघ्या 44 तासांत मृत्यू झाला. बुलढाणा येथील जानेफळ तालुक्यात काम करणाऱ्या डॉ. गोपाळ क्षीरसागर, वय 37, तसेच भुसावळ येथील डॉ.उमेश खानापूरकर यांचा देखील कोरोनामुळे मृत्यू झाला. डॉ. खानापूरकर हे संपूर्ण भुसावळ जिल्ह्यात गरिबांचे डॉक्टर म्हणून प्रसिद्ध होते. 22 ऑगस्ट च्या टाइम्स ऑफ इंडियातील बातमीनुसार राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका 32 वर्षीय डॉक्टरचा ड्युटी वर असतांनाच कोरोनाची लागण होऊन मृत्यू झाला. धुळे जिल्ह्यातील सोनगीर गावात ग्रामीण रुग्णालयात प्रभारी अधिक्षकाचे काम सांभाळणाऱ्या डॉ.कल्पेश वाघ यांचे 19 ऑगस्ट रोजी कोरोनामुळे निधन झाले. सोनगीर गाव हे धुळ्यापासून तासाभराच्या अंतरावर असून गावात सोयीसुविधांनी युक्त रुग्णालय नसल्याने उपचारासाठी धुळ्यालाच यावे लागते. सोनगीरसारख्या धुळ्याच्या आजूबाजूला असणाऱ्या अनेक खेड्यांमधील तसेच आदिवासी भागातील रुग्ण धुळ्यातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. चुडामण पाटील, वय 50 वर्षे, यांच्याकडे तपासणी साठी येत असत. आरोग्य क्षेत्रात सर्वत्र माणुसकीला दूर सारून पैसे उकळण्याचा धंदा सुरु असतांना डॉ. चुडामण पाटील हे धुळ्यातील व आजूबाजूच्या खेड्यांतील गरीब जनतेचे एकमेव विश्वासस्थान होते. धुळ्यात अनेक वर्षे त्यांनी मानवतावादी दृष्टिकोन बाळगत रुग्णसेवा केली. त्यांचा देखील 13 ऑगस्ट रोजी कोरोनाने पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल मध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला. 12 सप्टेंबर ला नागपुरातील नामांकित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात वरीष्ठ फिजिशियन म्हणून प्रोफेसर म्हणून काम केलेल्या व दांडे रुग्णालयात सध्या काम करत असलेल्या डॉ संजय पुरी, वय 66 तसेच सीताबर्डी येथील एका रुग्णालयात कोविड ड्युटी करत असलेल्या डॉ. नाना मेश्राम ह्या दोघांनीही कोरोनाशी लढतांना अखेरचा श्वास घेतला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या डॉ.सोनाली कुरहडकर एका 24 वर्षीय अवयवांच्या हालचालींवर इलाज करणाऱ्या ( ऑक्युपेशनल थेरपिस्ट) डॉक्टरचा देखील कोरोनाची लागण होऊन मृत्यू झाला. कोरोना ड्युटी वर नसलेल्या परंतु रुग्णालयात इतर विभागांत काम करणाऱ्या आरोग्यकर्मींना देखील कोरोनाची लागण होत असल्याचे यावरून दिसून येते.

टाइम्स ऑफ इंडिया च्या 13 जुलै ला छापून आलेल्या बातमी नुसार 1,200 हुन अधिक डॉक्टरेतर आरोग्य कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. डॉक्टरांपर्यंतच सुरक्षा उपकरणे पुरेसे पोहचत नाहीत तर इतर कर्मचाऱ्यांपर्यंत ते पोहचणे एक अशक्य गोष्ट आहे. त्यामुळेच मोठ्या प्रमाणावर आरोग्य कर्मचाऱ्यांना व त्यांच्या परिवारातील सदस्यांना कोरोनाची लागण झाली आहे. देशभरातील स्वच्छता कर्मचारी, स्मशान भूमीत काम करणारे कामगार, सार्वजनिक स्वच्छतागृहांची साफ सफाई करणारे कामगार ह्यांना देखील सुरक्षा उपकरणांची सर्वाधिक गरज असतांना त्यांच्याकडून सुरक्षा न पुरवताच काम करवून घेतले जात आहे. कोरोनाची लागण झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी विलगीकरणाची सोय नाही, अत्यंत लहान अश्या त्यांच्या घरांमध्ये विलगीकरणाचे पालन करणे कठीण ठरत आहे. अत्यन्त तणावग्रस्त वातावरणात देशभरातील आरोग्यकर्मी काम करत आहेत. त्यांना कुणालाही दिवे, मेणबत्ती, थाळी, टाळी यांची गरज नाही. त्यांना खऱ्या अर्थाने धन्यवाद मानायचे तर त्यांची सुरक्षा सुनिश्चित करायला हवी. त्यासाठी एकंदरीत देशातील रुग्णसंख्या आटोक्यात आणण्यावर भर देणे गरजेचे आहे, व्यापक कोरोना चाचण्या करून कोरोना पॉझिटीव्ह असलेल्या, लक्षणे दाखवणाऱ्या किंवा न दाखवणाऱ्या रुग्णांचे विलगीकरण अत्यंत गरजेचे आहे. तसेच आरोग्यकर्मींच्या सुरक्षेसाठी डॉक्टर्स व रुग्णालयातील प्रत्येक स्तरातील कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा उपकरणांची व्यवस्था करणे नितांत आवश्यक आहे, परंतु मोदी सरकारने कामगार कष्टकरी व देशातील गरीब जनतेप्रमाणेच आरोग्य कर्मचाऱ्यांनाही मरायला रस्ता मोकळा करून दिला आहे आणि मरणाच्या रस्त्यावरून धोका पत्करत चालण्याव्यतिरिक्त त्यांच्याकडेही कोणताही पर्याय उरलेला नाही! सरकारकडे आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या कोरोनामुळे झालेल्या मृत्यूची कुठलीही माहिती उपलब्ध नाही यात काहीच आश्चर्य नाही कारण या फॅसिस्ट सरकारला खरोखर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या जीवनाचे काहीही देणेघेणे नाही!

## लेखणीचे सैनिक आणि झुंझार पत्रकार गणेश शंकर विद्यार्थी ह्यांच्या जयंतीनिमित्त (26 ऑक्टोबर) त्यांची काही निवडक उद्धरणे

'आपल्या देशात धर्माच्या नावाखाली काही निवडक लोक आपले निकृष्ट हितसंबंध साध्य करण्यासाठी लोकांना आपआपसात भांडवतात. धर्म आणि श्रद्धेच्या नावाखाली चालणारा हा भयंकर व्यापार रोखण्यासाठी धैर्य व चिकाटीने काम केले पाहिजे.'

'एकीकडे, जेथे जनआंदोलन आणि राष्ट्रीय चळवळ होती, त्याच वेळी त्यांच्याबरोबरच जातीय आणि जातीयवादी चळवळी जाणीवपूर्वक सुरू केल्या गेल्या कारण या चळवळी ना इंग्रजांच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या विरोधात नव्हत्या, तर इतर जातींच्या विरोधात होत्या.'

'काही लोक हिंदू राष्ट्र - हिंदु राष्ट्र' हा जयघोष करतात. आम्ही नाही म्हटले तर आम्हाला माफ करा. आपण यावर भर देऊयात की ते एक मोठी चूक करत आहेत आणि त्यांना अद्याप राष्ट्र या शब्दाचा अर्थ समजलेला नाही. आम्ही भविष्यवेत्ते नाही, पण ही अवस्था आपल्याला सांगते आहे की यापुढे जगात हिंदू राष्ट्र निर्माण होऊ शकत नाही.'



'देशाच्या स्वातंत्र्यासाठी जो लढा सुरू होता, त्यातील तो दिवस अगदीच वाईट होता ज्या दिवशी खिलाफत, मुल्ला, मौलवी आणि धर्माचार्यांना स्वातंत्र्याच्या क्षेत्रात स्थान देणे आवश्यक समजले गेले. एक प्रकारे, त्या दिवशी आम्ही स्वातंत्र्याच्या क्षेत्रात एक पाऊल मागे टाकले. आपल्या त्याच पापांची फळे आपल्याला भोगावी लागत आहेत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या ह्या चळवळीनेच मौलाना अब्दुल बारी आणि शंकराचार्य यांना देशासमोर वेगळ्या स्वरूपात मांडून अधिक सामर्थ्यवान बनविले आणि ह्या कार्याचा परिणाम असा झाला आहे की या वेळी आपल्या हातांनी वाढवलेली ह्यांची व ह्यांच्या सारख्या लोकांची शक्ती आपलीच मुळं उखडून टाकण्याचे आणि देशात धार्मिक वेडेपणा, भांडखोरपणा आणि धार्मिक उत्पाताचे राज्य स्थापित करण्याचे काम करत आहे.'

'लेनिनच्या अपूर्ण ग्रंथांची पाने केवळ रशियामध्येच नाही, सर्वत्र लिहिली जात आहेत. उठाव होतील, बदलांचे प्रवाह बदलतील, जुना आततायी पणा गळून पडेल.'

• संपादक मंडळ – सोमनाथ केंजळे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 9156323976, 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित